113

# GOLDEN JUBILEE
# *Souvenir*

## S. N. D. THACKARSEY KANYASHALA
## BOMBAY



संस्कृता स्त्री परा शक्तिः।

# सुवर्ण महोत्सव

स्मरणिका

# श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी कन्याशाळा

मुंबई ४.

# सुवर्ण महोत्सव स्मृतिग्रंथ

प्रकाशन १ फेब्रुवारी १९७४

हस्ते-**श्रीमती सुलभा पाणंदीकर**, एम्.ए.एम लिट्.
( भूतपूर्व शिक्षण संचालक महाराष्ट्र राज्य )

स्वागताध्यक्ष-**माननीया डॉ. श्रीमती प्रेमलीलाबाई ठाकरसी**, डी. लिट.

स्मृतिग्रंथ संपादिका-**सौ. प्रतिभा भवाळकर**, B.A.M.ED.

कार्यकारी संपादिका-**विमलकीर्ती स. महाजन**, M.A.M.ED.

संपादकीय मार्गदर्शन- **सौ. सुमती केतकर** B.A.B.ED.

**सौ. शोभा चिंचणकर**, B.A.B.ED.

# विषयानुक्रम


शुभ संदेश

संपादकीय

संस्था वृत्तांत

महर्षि अण्णासाहेब कर्वे

सर विठ्ठलदास ठाकरसी

श्रीमती डॉ. प्रेमलीला ठाकरसी

श्रीमती सीताबाई अण्णिगेरी

सौ. प्रतिभा भवाळकर

शालेय जीवनाच्या स्मृती

माजी विद्यार्थिनींच्या आठवणी

कांही नामवंत माजी विद्यार्थिनी

शिक्षकांच्या आठवणी



प्रकाशिका :

सौ. प्रतिभा भवाळकर
बी.ए. एम.एड.

मुद्रक :

अ. भि. दळवी
कल्पनार्ट, काकडवाडी, व्ही. पी. रोड, मुंबई ४.


The President is glad to know from your letter of the 9th January, 1974 that Shreemati Nathibai Damodar Thackersey Kanyashala, Bombay will celebrate its **Golden Jubilee** on the 1st February, 1974. He congratulates the staff and students on the occasion and sends his best wishes for the continued progress of the Kanyashala in the years to come.





**Shri Y. B. Chavan,**
Finance Minister,

The Finance Minister sends his good wishes for the success of the **Golden Jubilee** Celebrations of the S. N. D. T. Kanyashala Bombay.

I am glad to know that the S. N. D. Thackersey Kanyashala, Bombay is going to celebrate its **Golden Jubilee** on 1st February 1974. I am happy to send my best wishes for the success of the celebrations.

**Shri H. R. Gokhale,**
Minister of Law & Justice & Company Affairs.





**Shri V. P. Naik**
Chief Minister, Maharashtra,


I am glad to know that the S. N. D. Thackersey Kanyashala, Bombay is celebrating the **Golden Jubilee** on 1st Febuary 1974 at Rang Bhavan.


The School has completed 50 years of its useful service in imparting education to the students from low income group sections of the community in Khetwadi, Mazgaon, Dongri, Kamathipura and Girgaon Area.

I am glad to know that the school is not lagging behind in extra curricular activities like organising Small Savings Drive and Fund Collection Drive in National and State level calamities.

I wish the Golden Jubilee celebrations all success.

**Shri A. N. Namjoshi,**
Minister for Education And Sports, Maharashtra.





## मधुकरराव चौधरी

महात्मा फुलेंपासून स्त्री शिक्षणाबाबत महाराष्ट्रामध्ये कार्य सुरू झाले व त्यानंतर या कार्यासाठीं अनेक सुधारकांनी प्रयत्न केले. त्यामध्ये म. धोंडो केशव कर्वे यांचे नांव प्रामुख्याने घ्यावे लागेल. त्यांनी विद्यार्थिनीकरितां एक स्वतंत्र विद्यापीठ स्थापन केले. त्याच विद्यापीठाच्या विद्यमाने चालविण्यात येणारी कन्याशाळा ही संस्था स्त्री शिक्षणाबाबत गेली ५० वर्षे सातत्याने प्रयत्न करीत आहे ही अत्यंत समाधानाची गोष्ट आहे. अजूनही स्त्री शिक्षणाबाबत प्रयत्न होण्याची आवश्यकता आहे. या दृष्टीने आपल्या संस्थेच्या सुवर्ण महोत्सव समारंभातून या कार्यक्रमाला गती प्राप्त होईल असा विश्वास वाटतो.

आपल्या शाळेच्या सुवर्ण महोत्सव समारंभास माझ्या शुभेच्छा.

[ म. ध. चौधरी ]

श्री. ना. दा. ठा. कन्याशाळेच्या स्थापनेपासून मुंबईतील वाटचाल मी पहात आलो आहे. श्रीमती सीताबाई अण्णिगेरी यांनी जवळ जवळ सुरवातीपासून शाळा हातात घेऊन ३५ वर्षे तिची जोपासना केली आणि खूपच वाढ व प्रगती केली. इतक्या दीर्घकालपर्यंत एखाद्या संस्थेचे नियंत्रण करण्याची संधी फार थोड्याना मिळते. सीताबाईंनी तिचा पूर्ण उपयोग करून शाळेला वैशिष्टपूर्ण स्थान प्राप्त करून दिले. त्यांच्या मागून येणाऱ्या मुख्याध्यापिकेला शाळेची थोर परंपरा राखून तिला प्रगतिपथावर ठेवणे सोपे नव्हते. पण सौ. प्रतिभा भवाळकर यानी तितक्याच एकरूपतेने शाळेचा सर्वांगीण विकास करून अनेक नवीन उपक्रम हाती घेतले व मुंबईतील मुलींच्या शाळांमध्ये आघाडीवर स्थान मिळविले आहे. त्यांच्या कार्याचा गौरव राष्ट्रपती पदकाने झाला आहे त्यामुळे कन्याशाळेलाहि प्रतिष्ठा मिळाली आहे. आज संस्थेच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त मनःपूर्वक अभिनंदन करून उत्तरोत्तर शाळेला जास्त उज्वल यश मिळत जावो असे चिंतितो.

**भास्करराव धोंडू कर्वे**


श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी कन्याशाळा ५० वर्षें पूर्ण करून आपला सुवर्ण महोत्सव साजरा करीत आहे ही अतिशय आनंदाची व अभिमानाची घटना आहे. गरीब व कनिष्ठ मध्यमवर्गांतून आलेल्या विद्यार्थिनींना गेली ५० वर्षें सतत ज्ञानदान करून संस्थेने महर्षि कर्व्यांचे महान कार्य पुढें चालू ठेवले आहे. 'एक सुशिक्षित स्त्री म्हणजे एक सुशिक्षित घर' ही वस्तुस्थिती लक्षात घेता या ज्ञान यज्ञाचे महत्त्व किती तरी पटींनी वाढते. ५० वर्षांपूर्वी स्त्री शिक्षणाचा विशेष प्रसार नव्हता तेव्हांपासून ही कन्याशाळा हे महत्त्वाचे कार्य करीत आहे.

पुस्तकी शिक्षणाबरोबर अनेक राष्ट्रीय कार्यांत विद्यार्थिनींना सहभागी करवून शाळेने शिक्षणाची प्रत्यक्ष जीवनाशी सांगड घातली आहे. अल्पबचतीतील कार्याबद्दल शाळेने आजपर्यंत अनेक सन्मान मिळविले आहेत.


एस. एन. डी. टी. कन्याशाळेच्या कार्याचा हा वृक्ष अनेक शाखांनी बहरून यावा व असंख्य कन्यांचे आधारस्थान ठरावा अशी शुभेच्छा या प्रसंगी मी व्यक्त करतो.

श्री. कुमार

वरीष्ठ उपसंचालक
अल्पबचत संचालनालय, मुंबई.



श्रीमती नाथीबाई दामोधर ठाकरसी कन्याशाळेचे दर्शनी चित्र



कन्याशाळेच्या विद्यार्थिनींचे उपलब्ध झालेलें जुन्यांत जुनें छायाचित्र (१९२६-२७)





श्री. ना. दा. ठाकरसी भारतवर्षीय महिला विद्यापीठाचे
संस्थापक व नाथीबाई कन्याशाळेचे जनक.

श्री. सीताबाई अणिगेरी ८१ वा वाढदिवस चरित्र प्रकाशन समारंभ.





सौ. प्रतिभा भवाळकर यांना राष्ट्रपती पारितोषक मिळालं त्यावेळी शाळेतर्फे सत्कार केला त्यावेळचा प्रसंग.

## कै. श्रीमती नाथीबाई ठाकरसी




कै. सर विठ्ठलदास यांच्या मातुश्री यांच्या स्मरणार्थ पंधरा लाखांची देणगी देऊन सर विठ्ठलदास यांनी विद्यापीठास कायमचें ऋणी करून ठेविले आहे.



रौप्य महोत्सव १९४९ शिक्षकवर्ग

## दानशूर कै. विठ्ठलदास ठाकरसी



इ. स. १९२० मध्यें आपली उदार देणगी देऊन महिला विद्यापीठाच्या
भवितव्याला यांनीं उजाळा आणिला



शिष्यवृत्ती मिळविणाऱ्या विद्यार्थिनी




ह्या आमच्या शाळेतील "गानकोकीळा"
कोणत्याही प्रसंगी कुठेही ह्यांचे समूहगायन कार्यक्रम असतात.

## लेडी प्रेमलीला विठ्ठलदास ठाकरसी




कन्याशाळेच्या व्यवस्थापक समितीच्या अध्यक्षा व महिला विद्यापीठाच्या उत्कर्षासाठी सतत झटणाऱ्या निष्ठावंत कार्यकर्त्या.




श्री. बारोट साहेब प्रयोगशाळेमध्यें प्रयोग पहात असतांना

'पॉट कल्चर' इतर शाळांतील शिक्षकांचे शिबिर






**कै. टी. एन्. मालवी**
पहिले अध्यक्ष १९२४–२५



**कै. डॉ. वाय. जी. नाडगीर**
आरंभीच्या दिवसांत यांचे नेतृत्व शाळेच्या उत्कर्षाला कारणीभूत झाले.
अध्यक्ष १९२५–३०



**श्रीयुत के. सी. देसाई**
व्यवस्थापक समितीचे
माजी अध्यक्ष १९३१–३३



**कै. सर सीताराम पाटकर**
महिला विद्यापीठाचे माजी कुलगुरु–
व कन्याशाळेच्या व्य. समितीचे
अध्यक्ष—१९३३–३५.




कै. ले. क. अ. बा. गजेंद्रगडकर


## माजी अध्यक्ष




न्या. भालचंद्र नारायण गोखले




पहिले मुख्याध्यापक
कै. एल्. बी. नायक (१९२४-२५)



श्रीमती पार्वतीबाई आठवले
(कन्याशाळेच्या पहिल्या व्यवस्थापिका)



श्रीमती बारुबाई शेवडे
(हिंगणे शिक्षण संस्थेच्या आजन्म सेविका)




श्रीमती सिताबाई अणिगेरी
(माजी मुख्याध्यापिका)



सौ. प्रतिभा भवाळकर
हल्लीच्या मुख्याध्यापिका
१९५८ पासून



सौ. वासंती टिकेकर
हल्लीचे पर्यवेक्षक सकाळचे अधिवेशन
१९५९ पासून



श्री. द. अ. बर्वे
हल्लीचे पर्यवेक्षक
दुपारचे अधिवेशन
१९६५ पासून



दुपारचे अधिवेशन-मुख्याध्यापिका व (शिक्षक वर्ग)



सकाळचे अधिवेशन शिक्षक वर्ग



मुख्याध्यापिका, पर्यवेक्षक, लेखानिक व इतर कर्मचारी वर्ग

महालक्ष्मी ट्रस्टचे मॅनेजिंग ट्रस्टी श्री बॅरट यांच्या समवेत शिक्षकवर्ग





'कुंडीतील लागवड'' तो कार्यानुभव प्रात्यक्षिक करतांना



पुस्तक बांधणी



विद्यार्थिनी शास्त्रीय उपकरणे करीत आहेत



गृहविज्ञान विषयाचे प्रात्यक्षिक करतांना




कबड्डी खेळतांना ( स्पर्धक विद्यार्थिनी )

"पिठातून गोळी काढणे" ह्यातील स्पर्धक विद्यार्थिनी





'गर्ल गाईड' ह्या कार्यानुभवातील विषयांचे प्रात्यक्षिक




'गायन' ह्या विषयाचा वर्ग



शाळेतील ग्रंथालयात विद्यार्थिनी वाचन करीत असतांना



"घरगुती खाद्य पदार्थ" विकण्याची शाळेत व्यवस्था केली आहे.
विद्यार्थिनी रांगेत पदार्थ घेत असतांना



केरळचे अर्थमंत्री श्री. आदियोगी व डेप्युटी डायरेक्टर श्री. जोग अल्पबचत खात्याचे
प्रमुख अधिकारी श्री. करूर व श्री. वैद्य यांनी शाळेला भेट दिली त्या प्रसंगी.



केरळचे अर्थमंत्री श्री. आदियोगी व सौ. भवाळकर शाळेतील
अल्पबचतीचं काम पहात असतांना




"अल्पबचत" मोहिमेचे संचालक श्री. वैद्य यानीं शाळेतील "संचायिका"
हा उपक्रमाचे उद्घाटन केले त्या प्रसंगीचे दृश्य




आर. एस. पी. कॅम्प, मालाड


कलेक्टर देवस्थळी, सौ. देवस्थळी, सौ. भवाळकर, श्री. गुणवन्त मांजरेकर



रंगावली प्रदर्शन १९७४

श्री. यमुनाबाई खाडीलकर रंगावली पहात असतांना समवेत सौ. भवाळकर






कै श्री. म. पां. वैद्य एम्. ए. एलएल बी., बी. टी.

ॲक्टिंग सुपरिंटेंडेंट व पहिले पर्यवेक्षक


*To the Children*

Of the past
who are women today,
to the children of the present
who will be the mothers of tomorrow
and to the children of the future
who will mould the destinies
of our nation,

*We dedicate this*
**GOLDEN JUBILEE Souveuir**

*1st February 1974.*

# आठ शिक्षकांपासून अडतीस शिक्षकांपर्यंतची प्रगति




# संपादकीय

शाळेला ह्या वर्षी ५० वर्षे पूर्ण होत आहेत. त्या निमित्ताने प्रस्तुतचा स्मृतिग्रंथ प्रसिद्ध करण्यास आम्हांस आनंद होत आहे.

महर्षि अण्णासाहेब कर्वे ह्यांनी ह्या शाळेची १९२४ मध्ये स्थापना केली. कै. एल. बी. नायक, कै. टी. एन. मालवी, कै. डॉ. वाय. जी. नाडगीर, कै. श्रीमती पार्वतीबाई आठवले, कै. श्रीमती वारूबाई शेवडे, कै. ले. क. अ. बा. गजेंद्रगडकर, कै. जस्टिस पाटकर, जस्टिस गोखले व श्रीमती सीताबाई अण्णिगेरी यांचे मार्गदर्शन मिळून १४ मुलींनी सुरवात झालेल्या शाळेत आज एक हजारांवर मुली शिक्षण घेत आहेत.

महर्षि अण्णासाहेब कर्वे यांच्या स्त्रीशिक्षणविषयक स्वप्नांना मूर्त स्वरूप आणण्यासाठी दानशूर कै. सर विठ्ठलदास ठाकरसी यांचेकडून आर्थिक स्थैर्य लाभले. माननीय डॉ. श्रीमती प्रेमलीलाबाई ठाकरसी यांच्या सहाय्यामुळे शाळेची प्रगती होत आहे.

सुवर्णमहोत्सवाचा हा सोहळा पाहण्यासाठी कै. वैद्य, श्री. वीरकर, श्री. केळकर, सौ. कोरगावकर, श्री. सामंत, श्री. साखरदांडे, श्री. कोतवाल, प्रा. गोखले, श्री. अमलादी, श्री. भेंडे, संघाच्या अध्यक्षा सौ. इंदिराबाई गोखले व आपल्या शाळेचा पहिला शिपाई बाळू ही मंडळी आज आमच्यामध्ये नाहीत याची मनाला हुरहूर वाटते.

प्रस्तुत ग्रंथामध्ये शिक्षक व विद्यार्थिनी यांच्या शालेय जीवनातील मधुर स्मृती ग्रथित केल्या आहेत. संस्थेचा वृत्तांत व शाळेच्या काही आधारस्तंभांची चरित्रे व शाळेच्या काही नामांकित माजी विद्यार्थिनींचा परिचय देण्यात आलेला आहे.

पेपरटंचाईमुळे काही लेख देता आले नाहीत. क्षमस्व.

या अंकाची गुणवत्ता वाढविण्यात अनेक व्यक्तींनी हार्दिक सहकार्य दिल्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. संस्थेच्या संकल्पपूर्तीसाठी आणि हा सुवर्णमहोत्सव यशस्वी करण्यासाठी ज्या संस्था व व्यक्ती यांजकडून देणगी आणि स्मृतिग्रंथासाठी व्यावसायिकांकडून शुभेच्छा या रूपाने अमोल सहाय्य मिळाले त्यांचेही आम्ही ऋणी आहोत. त्यांनी आमच्या संस्थेवर असाच कृपालोभ ठेवावा. सुवर्णमहोत्सवाच्या सर्व कार्याला आपल्या शाळेच्या सल्लागार समितीचे हार्दिक अनुमोदन व सहाय्य मिळाले याबद्दल आम्ही कृतज्ञ आहोत.

माननीया डॉ. श्रीमती प्रेमलीलाबाई ठाकरसी ह्या सुवर्णमहोत्सव समितीच्या अध्यक्षा, श्रीमती शारदाबेन दिवाण, आजच्या कार्यक्रमाच्या अध्यक्षा व प्रमुख पाहुणे म्हणून श्रीमती सुलभा पाणंदीकर लाभल्या हे आमचे महद्भाग्य होय.

हा स्मृतिग्रंथ ययासंभव निर्दोष, संग्राह्य व अधिक सुबक व्हावा यासाठी ज्यांचे परिश्रम कारणीभूत झाले त्या सर्वांचे आम्ही ऋणी आहोत.

वरील सर्वांचा लोभ संस्थेला असाच निरंतर लाभो ही विनंती.

# संस्था-वृत्तान्त

आजचा हा सोहळा वैशिष्ट्यपूर्ण आहे. कारण शाळेचा सुवर्णमहोत्सव आणि उदारदात्याचे म्हणजे सर विठ्ठलदास ठाकरसींचे जन्मशताब्दी वर्ष. ह्या सुवर्ण क्षणांनी ओतप्रोत भरलेले हे वर्ष : १ फेब्रु. १९७४ हा वर्ष-दिन साजरा करण्याचं महद्भाग्य आम्हा विद्यार्थिनींना व शिक्षकवर्गाला लाभलेलं आहे.

१ फेब्रु. १९२४ हा शाळेचा स्थापना-दिन. पहिल्या स्त्री-पर्यवेक्षिका व गुरुवर्य अण्णासाहेब कर्वे यांच्या आरंभापासूनच्या सहकारी श्रीमती पार्वतीबाई आठवले व कै. नायक यांनी सुरवातीला अठरा मुली घेऊन आरंभीच्या काळात कष्ट सोसून काम केले व संस्थेला स्थैर्य आणलं.

१ जाने. १९२५ मध्ये सीताबाई अण्णिगेरी मुख्याध्यापिका झाल्या. त्यानंतर १९२९ मध्ये शाळेचं रूपांतर पूर्ण हायस्कूलमध्ये झालं. व त्या वर्षी महिला विद्यापीठाच्या प्रवेशपरीक्षेला विद्यार्थिनी प्रथम पाठविल्या. १९३१ मध्ये अण्णिगेरीबाई उच्चशिक्षणासाठी अमेरिकेस गेल्या. तेव्हा त्यांच्या गैरहजेरीत श्रीमती वारूताई शेवडे ह्यांनी मुख्याध्यापिकेचं काम पाहिले.

शाळेची भरभराट होत होती. विद्यार्थीनींची संख्या चारशेपर्यंत गेली, व प्रवेशपरीक्षेचा निकाल उत्तम लागू लागला. मुलींची मासिकं, साप्ताहिक सभा, वाचनालय, विविध खेळ, समाजकार्य यांची जोड देऊन शैक्षणिकदृष्ट्या कन्याशाळेच्या हातून भरीव कार्य होऊ लागले.

शाळेची स्वतःची इमारत होण्यासाठी इमारतनिधी चालू केला. श्री. ए. बी. पंडित यांच्या सौजन्यानं वाई येथील श्री देव यांच्या ट्रस्टमधून इमारतनिधीला वीस हजार रु. मिळाले.

सध्याची शाळेची इमारत शाळेच्या मालकीची आहे. गृहिणींना भावी माता म्हणून जीवन व्यतीत करायचे असल्यामुळे तदनुरूप शिक्षणक्रम असायला हवा. ह्यासाठी मातृभाषेचं माध्यम स्वीकारून व ऐच्छिक विषयांची जोड देऊन शास्त्रशुद्ध पायावर मुलींचे शिक्षण करावे हे अण्णांचे स्वप्न साकार करण्यास कन्याशाळा यथाशक्ती झटत आहे.

### शाळेचे उपक्रम

कन्याशाळेमध्ये अभ्यासेतर व अभ्यासानुवर्ती उपक्रम व्यवस्थित पार पाडले जातात.

(१) आकाशवाणीवर शिक्षक-मुली यांचे कार्यक्रम वारंवार सादर केले जातात.

(२) वाङ्मयशाखेतील 'ज्ञानलता' हे हस्तलिखित व विज्ञानशाखेतील 'विज्ञान मंजुषा' ही नियतकालिकं विद्यार्थिनींच्या मदतीनं प्रसिद्ध केली जातात. गायन, चित्रकला, वक्तृत्व, खेळ, नाट्य वगैरे स्पर्धांमधून आमच्या शाळेतील विद्यार्थिनी हौसेनं भाग घेतात.

फ्लॅग-डे, डिफेन्स, निरक्षरतानिर्मूलन, हिंगणे भाऊबीजफंड, विद्यार्थी कल्याण निधी वगैरे उपक्रमांमध्ये मुली निधी गोळा करतात.

ह्या शाळेमध्ये सर्व मुलींनी बचतखाती उघडली आहेत. शाळा 'बचतशाळा' झाली आहे. महाराष्ट्र सरकारकडून या बाबतीत शाळेला गेल्या वर्षी ५ हजार व यंदा चार हजार रुपये अनुदान मिळाले आहे.

महाराष्ट्र बचतखात्याचे संचालक श्री. वैद्य यांच्या हस्ते शाळेत हल्लीच 'संचयिका' सुरू केली आहे. त्याला चांगला प्रतिसाद मिळत आहे.

शाळेत राष्ट्रीय दिन, जयंती, पुण्यतिथी हे कार्यक्रम नियमितपणे साजरे केले जातात.

म. गांधी जन्मशताब्दीनिमित्त अनेक प्रकल्प हाती घेऊन त्यांचे प्रदर्शन भरविलं होतं. आंतर-राष्ट्रीय वर्षी काही अंक तयार केले. भारताच्या रौप्यमहोत्सवानिमित्त कार्यक्रम यथोचित साजरे केले. बांगलादेश, अल्पबचत, म. गांधी, पं. जवाहरलाल नेहरू, शैक्षणिक उपकरणं, रंगावली अशा प्रकारची अनेक प्रदर्शनं भरविली. मुलींसाठी शाळेत R. S. P. चे पथक आहे. महाराष्ट्र-सरकारचा नवीन अभ्यासक्रम संपूर्णपणे गेल्या वर्षी चालू केला आहे.

गर्ल-गाईड, कुंडीतील लागवड, परसातली बाग, पुस्तकबांधणी, पाव-बिस्किटं, शालेय उपकरणांची निर्मिती हे सर्व कार्यानुभवाचे विषय सुरू केले.

पूर्वीपासून गृह-कौशल्य, शिवण, गायन, चित्रकला हे विषय शिकविले जातात.

हल्लीच शाळेत टेलिव्हिजन घेतला आहे. त्यावरील सोमवार, शुक्रवार या दोन्ही दिवशी होणाऱ्या शालेय कार्यक्रमांचा विद्यार्थिनींना लाभ मिळतो.

# महर्षि अण्णासाहेब कर्वे

सुवर्णाचं मंदिर, सुवर्णाचा कळस. त्यावर सूर्यकिरण पसरल्यावर मग त्या सौंदर्याचं काय वर्णन करावं! सारं कसं अवर्णनीय. सुवर्णाचा कळस आपल्याला लाभलेल्या अत्युच्च पदामुळे जवळून पहाणाऱ्याचं व दूरून पहाणाऱ्याचंही लक्ष आपल्याकडे वेधून घेतो. हे त्या कळसाचं भाग्य. पण त्या कळसालाही व पहाणाऱ्यालाही कधी कधी विस्मरण पडत असेल त्या मंदिराच्या पायाखाली असलेल्या विटेचं-पत्थराचं.

मंदिराचा पाया मजबूत असला तरच मंदिर दिमाखानं उभं राहू शकतं नाही का?

महर्षि धोंडो केशव कर्वे म्हणजेच अण्णासाहेब कर्वे यांनी ह्या स्त्रीशिक्षणाची-कन्याशाळेची पायाभरणी केली. हा पाया जर पक्का रोवला गेला नसता तर आजचा हा सुवर्णमहोत्सव—हा सोहळा पाहू शकलो नसतो. त्यांच्या पुण्याईनं आम्ही हे शिक्षण घेऊ शकलो.

महर्षी कर्वे हे लोकोत्तर पुरुष होते. राजकारणापेक्षा समाजसुधारणा त्यांनी श्रेष्ठ मानली. दुःखात पिचत असणाऱ्या विधवा, अनाथ, पतित स्त्रियांच्या हाकेला प्रतिसाद दिली. उक्तीपेक्षा कृतीला महत्त्व दिले. स्वतः एका विधवेशी पुनर्विवाह करून प्रात्यक्षिकाने आपले म्हणणे लोकांना पटवून दिले.

समाजाच्या टीकेचे प्रहार सहन करून त्यांनी स्त्री-शिक्षणाची, स्त्री-उद्धाराची धुरा वाहिली. स्त्रियांना मातृभाषेतून संस्कृतीचे व संसाराचे व्यवहारोपयोगी शिक्षण देण्यासाठी स्त्रियांचं स्वतंत्र विद्यापीठ असावे ही कल्पना काढली व ते स्वप्न साकार करून दाखवले. सामाजिक बंधनाने रूढींने-परंपरेने जखडलेल्या स्त्रीला मुक्त केले. स्वावलंबी केले. त्यांच्या प्रयत्नानं तिच्या पंखात सामर्थ्य भरले.

पाऊणशे वर्षांपूर्वीची स्त्री व आजची स्त्री किती परस्परविरोधी चित्र! शिक्षणाची सर्व दालने तिच्यासाठी मुक्त झाली. कोणत्याही दालनांत स्वेच्छेने ती पदार्पण करू शकते. सामाजिक, धार्मिक, राजकीय आंदोलनात ती निर्भयपणे वावरू शकते. हा कायापालट कुणी केला? अर्थात अण्णांनी. असे कोणतीही स्त्री अभिमानाने, ताठ मानेनं सांगू शकेल.

स्वाभिमानी जीवन जगण्यासाठी, स्त्रीत सामर्थ्य निर्माण करण्यासाठी ते प्रयत्न करत असतात. एकीकडे त्यांना त्यावेळचा समाज विरोध करू पहात होता. तरीही अण्णांनी जननिंदेचे काटे तुडवीत स्त्रियांच्या जीवनमार्गावर पसरलेले कांटे स्वतःच्या हातांनी दूर सारले. मार्ग सुखकर केला.

इ. स. १८९६ सालीं पंधरा-सोळा मंडळींची एक सभा भरवून त्या सभेत अनाथ बालिकाश्रमाची स्थापना करण्यात आली. १९०० सालीं हिंगण्याला पांचशे रुपये खर्चून त्यांनी एक लहान झोपडी बांधून तिथं आश्रम नेला. त्यावेळी त्या आश्रमात आठ विद्यार्थिनी होत्या. त्यांची व्यवस्था अण्णांच्या पहिल्या पत्नीच्या भगिनी अक्का यांच्याकडे होती.

आश्रमाची स्थापना झाल्यापासून आठ-दहा वर्षे सनातनी लोकांनी विरोध केला. वर्गणी मिळत नव्हती. कारण संस्थेची उपयुक्तता लोकांना पटत नव्हती. तरीही अण्णांनी आपल्या मार्गानेच जायचं निश्चित केल्यामुळे स्त्रीशिक्षणाविषयी असलेली कळकळ, चिकाटी, शुद्ध चारित्र्य यांचा लोकांना प्रत्यय यायला लागला. विरोधकांनी मांडलेला छळवाद हळूहळू ओसरू लागला.

विधवांच्या शिक्षणाची समस्या सुटली तेव्हां त्यांनी कुमारिकांच्या शिक्षणाची सोय संस्थेत करण्यासाठी

आश्रमाशेजारी विद्यालयाची स्थापना केली. त्यानंतर त्यांचे आणखी एक पाऊल पुढे पडले. त्यांनी स्त्रियांसाठी विद्यापीठ स्थापन केले. लक्ष्मी व सरस्वती यांची भेट व्हावी तशी महर्षि कर्वे व विठ्ठलदास ठाकरसी यांची भेट होऊन गजान्त लक्ष्मी ज्याच्या मंदिरात वास करीत होती अशा विभूतीने म्हणजेच सर विठ्ठलदास ठाकरसींनी अण्णांना विद्यापीठासाठी देणगी दिल्यामुळे त्या विद्यापीठाला स्थैर्य प्राप्त झाले.

अण्णांचे व्यक्तिमत्त्व म्हणजे तपस्येचे मूर्तिमंत उदाहरण. जीवनभर हालअपेष्टा–कष्ट सहन करीत दुसऱ्यासाठी देह झिजवला. अखेरपर्यंत स्थितप्रज्ञ राहिले.

हिंगण्याच्या तपोभूमीत–कर्मभूमीत ही विभूती वावरली. शतायुषी झाली. भारतसरकारनं भारतरत्न म्हणून पदवी बहाल करून त्यांचा गौरव केला.

त्यांच्या जीवनाचं मूल्यमापन केले तर हे आठवेल की ते शिस्तीचे भोक्ते होते. काटकसरी, हिशेबी होते. सज्जन, कर्तृत्ववान, शुद्धचारित्र्यसंपन्न व्यक्तीविषयी आपल्याला आदर वाटतो. आधार वाटतो.

ह्या युगपुरुषाचं वर्णन किती करावे तितके अपुरेच पडेल. कालप्रवाह वाहत असतो. त्याच्या उदरांत सारे गडप होतात. पण कालप्रवाहाला, मृत्यूला लाजविणारेही महापुरुष शरीरानं जरी संपलेले असले तरी कार्याने अमर होऊन राहातात. त्यांच्या कार्यस्मृती आपणाला उच्च ध्येयाप्रत नेण्यासाठी वेळोवेळी, क्षणोक्षणी मार्गदर्शक ठरतात. त्यांनी मळलेल्या वाटांनी जाताना त्यांच्या श्रमांना आपण विसरू शकत नाही. अण्णा आपल्यातून गेले, परंतु त्यांच्या स्मृती बकुलपुष्पाप्रमाणे ताज्या व सुगंधित राहातील.



लेखिका—विमलकीर्ती स. महाजन
एम. ए., एम. एड.

# सर विठ्ठलदास ठाकरसी–उदार कल्पतरू

**—विमलकीर्ती स. महाजन**

सर विठ्ठलदास ठाकरसी यांच्या जन्मशताब्दीचं हे वर्ष आणि श्री. ना. दा. ठाकरसी कन्याशाळेचा सुवर्णमहोत्सव हा मणी–कांचनयोग.

सर विठ्ठलदासांसारख्या असामान्यत्व पावलेल्या व्यक्तीचं जीवनचरित्र पाहिलं तर वाटतं की विभूती जिवंतपणीच नव्हे, तर मृत्यूनंतरही आपल्या समाधिस्थानातून आपणास उज्ज्वल सत्‌चारित्र्याचा दिव्य संदेश देत असतात. हे महापुरुष महान विचारवंत आपल्यामागे आपल्या महान देशबांधवांसाठी स्वतःच्या शुद्ध व उदात्त विचारांचा व निःष्कलंक जीवनाचा अमोल वारसा ठेवून जातात. यांचं जीवन महान वृक्षासारखं असतं.

**छायाम् अन्यस्य कुर्वन्ति तिष्ठन्ति स्वयमातपे।**
**फलान्यपि परार्थाय वृक्षाः सत्पुरुषा इव ॥**

ज्याप्रमाणे वृक्ष हे स्वतः उन्हाची झळ सहन करून दुसऱ्यांना सावली देतात, तसंच आपली फळंही चाखायला देतात. त्यावेळी आपल्याविषयी यत्किंचितही विचार मनांत आणीत नाहीत. असंच असामान्य व्यक्तिमत्त्व लाभलेल्या व्यक्तीचं जीवन असतं. अशा व्यक्तींना ऐहिक ऐश्वर्य, अधिकार, मानसन्मान आणि सत्ता यांची तिळमात्रही स्पृहा नसते. त्यांची आत्मिक श्रीमंती आगळीच असते.

भाटीया समाज औदार्यासाठी व दानधर्मासाठी सुप्रसिद्ध आहे. हा औदार्याचा वारसा ठाकरसी कुटुंबाने घेतला. माणसाला जी संपत्ती मिळते ती केवळ त्याच्या वैयक्तिक चैनीसाठी किंवा सुखोपभोगासाठी नसून गरीब व दुःखी लोकांच्या कल्याणासाठी तिचा वापर होईल, अशा तऱ्हेनं त्या संपत्तीचा विनियोग व्हावा अशी सर विठ्ठलदास ठाकरसींची धारणा होती.

## हिंदु विधवा

स्त्रियांच्या व मुलांच्या शिक्षणासाठी पुरेशा सुविधा उपलब्ध करून देण्याची फार मोठी गरज आहे याची सर विठ्ठलदासांना जाणीव होती. त्यांच्या कल्याणाची त्यांच्या मनांत एवढी तळमळ होती की त्यांच्या कल्याणासाठी साधनीभूत होणारी कोणतीही संस्था काढा, सर विठ्ठलदास त्या कार्यासाठी उदार देणगी देऊन आपला सक्रिय पाठिंबा देत असत. देशांतील स्त्रियांचे विमोचन व उन्नती यांवर आपल्या देशाची प्रगती अवलंबून आहे, हे त्यांनी पक्के ओळखले होते. इतर देशांच्या तुलनेत आपण किती प्रगती केली हे दर्शविणारा निर्देशांक म्हणजे आपल्या देशातील स्त्रियांची प्रतिष्ठा व प्रगती हा होय, अशी त्यांची धारणा होती. पुरोगामी स्त्रिया हे प्रगतिशील देशाचं निश्चित चिन्ह होय. ज्या देशातील स्त्रिया गुलाम, अशिक्षित व अज्ञानी आहेत, तो देश परावलंबी, मागासलेला व ऱ्हास पावलेला आहे हे निश्चित समजावं.

हिंदुसमाजाचा दृष्टिकोण विधवांच्या पुनर्विवाहाच्या बाबतीत सुधारत नव्हता तोपर्यंत त्यांची परिस्थिती सुधारण्यासाठी दुसरा मार्ग शोधण्याशिवाय अन्य पर्याय नव्हता. परिस्थितीने त्यांच्यावर लादलेल्या आर्थिक पराधीनतेतून त्यांची मुक्तता करण्यासाठी, त्यांना उपजीविकेचे साधन उपलब्ध करून देण्यासाठी निरनिराळ्या व्यवसायांचे किंवा कलाकुसरीचे शिक्षण देण्याची आवश्यकता होती. विधवांच्या प्रश्नांकडे सहानुभूतीने पाहून त्यांना सहाय्य करणाऱ्या संस्था हळूहळू स्थापन झाल्या. आरंभीच्या काळांत अण्णासाहेब कर्वे यांनी 'हिन्दु विडोज् होम असोसिएशन' नावाची संस्था १८९६ ला पुण्याला काढली. नंतर इ. स. १९१६ मध्ये इंडियन वुमेन्स युनिव्हर्सिटीची स्थापना झाली. संस्कृत भाषेचे सुप्रसिद्ध पंडित कै. सर रामकृष्ण भांडारकर हे या युनिव्हर्सिटीचे पहिले कुलगुरु आणि डॉ. र. पु. परांजपे हे उपकुलगुरु होते. ही युनिव्हर्सिटी खासगी व तिला सरकारी सनद किंवा मान्यता नव्हती. या संस्थेजवळ भांडवलही नव्हते.

## इंडियन वुमेन्स युनिव्हर्सिटी

ह्या युनिव्हर्सिटीचे कामकाज सुरू झाल्यानंतर एका वर्षाने विठ्ठलदासांनी कर्वे यांच्या 'विडोज होम' ला भेट दिली व एक हजारांची देणगी दिली. इ. स. १९१९ च्या वसंतऋतूत सर विठ्ठलदास व त्यांची पत्नी लेडी प्रेमलीला व ह्या विद्यापीठाच्या त्यावेळच्या विद्यार्थिनी श्रीमती सीताबाई अण्णिगेरी यांना आपल्या पत्नीची सोबतीण म्हणून त्यांनी बरोबर घेतले, व ही सर्व मंडळी जपानमध्ये कांही आठवडे राहिली. या वास्तव्याच्या काळांत सर विठ्ठलदास यांनी जपान वुमेन्स युनिव्हर्सिटीला भेट दिली. तेथल्या शिक्षणपद्धतीचा त्यांच्या मनावर परिणाम झाला व परत भारतांत आल्यावर त्यांनी महिला विद्यापीठाला पंधरा लक्ष रुपये देणगी दिली. मोठे देणगीदार या नात्याने युनिव्हर्सिटीच्या पदाधिकाऱ्यांना अट घातली ती अशी—

त्यांनी दिलेल्या देणगीच्या रकमेइतकी रक्कम त्यांनी अन्य देणग्या मिळवून गोळा करावी अथवा सरकारकडून विद्यापीठाला मान्यतेची सनद मिळवावी, अथवा हे विद्यापीठ प्रदान करीत असलेल्या पदव्या व पदविका यांना सरकारची मान्यता मिळवावी. तोपर्यंत त्यांनी या विद्यापीठाला दरसाल रु. ५२,५०० (पंधरालक्ष रुपयांचे साडेतीन टक्क्यांच्या हिशोबाने व्याज) देण्याचे आश्वासन दिले व कॉलेजसाठी इमारत बांधण्यासाठी एक लक्ष शायशी हजार रुपयांची आगाऊ रक्कम दिली. परंतु ह्या पूर्ण झालेल्या इमारती पाहाण्यास विठ्ठलदास राहिले नाहीत.

## वनिता विश्राम

ही संस्था गुजराथी समाजातील विधवा स्त्रियांसाठी फार चांगले काम करते. या संस्थेच्या विद्यमाने शैक्षणिक क्षेत्रातील कार्यही उत्तम चाललेले आहे. या संस्थेला त्यांनी सक्रिय पाठिंबा दिला आहे. त्याप्रमाणे श्री. ना. दा. ठाकरसी मुळजी वनिता बोर्डिंग स्कूल या संस्थेला एक लाख रुपये देणगी दिली.

वनिता विश्रामच्या राजकोट येथील शाखेस विठ्ठलदासांनी दरवर्षी सहा हजार रुपये याप्रमाणे सतत तीन वर्षे देणग्या दिल्या.

## सेवासदन

रमाबाई रानडे ह्या संस्थेच्या प्रमुख कार्यकर्त्या व श्री. गोपाळ कृष्ण देवधर हे समाजकार्यकर्ते यांनी विठ्ठलदासांकडे या संस्थेसाठी मागणी केली. औदार्याच्या महामेरूने त्यांच्यासाठी आपली तिजोरी उघडली व दरवर्षी खर्च करण्यासाठी रु. २४,००० चे स्वतंत्र खाते उघडले होते. सेवासदनच्या उपक्रमासाठी पटवर्धनवाडा विकत घेण्याचा विचार होता, त्यासाठी विठ्ठलदासांनी कर्ज दिले. पुढे मार्च १९१९ साली ही कर्जाची रक्कम देणगी म्हणून दिली. अशा रितीने त्यांनी पुण्याच्या सेवासदन, श्रीमती नाथीबाई आश्रम व सर विठ्ठलदास हॉल यांच्यासाठी एकूण पासष्ट हजार रुपयांच्या देणग्या दिल्या.

कार्याचा व्याप वाढल्यानंतर 'सेवासदन' या संस्थेने आपल्या शाखा काही दुसऱ्या गांवांतून उघडल्या. बारामती येथील शाखा त्यांच्या पत्नी लीलाबेन यांच्या नांवे स्थापन करण्यात आली. तिला दरवर्षी दोन हजार रुपयांची दहा वर्षे मुदतींची व लेडी प्रेमकुंवर या दुसऱ्या पत्नीच्या स्मरणार्थ स्थापन केलेल्या सातारा येथील शाखेस दरवर्षी एक हजार रुपयांची दहा वर्षे मुदतीची अशा देणग्या दिल्या. पुण्याच्या सेवासदन या मुख्य संस्थेच्या कार्यक्षम मार्गदर्शनाखाली या दोन्ही संस्था आपापल्या विभागात फार चांगले काम करीत आहेत. सर विठ्ठलदासांची भगिनी गंगाबाई हिची एकुलती एक कन्या मम्मुबाई निधन पावली, तिच्या स्मरणार्थ सेवासदनच्या विद्यमाने नर्सेसच्या प्रशिक्षणासाठी चालविलेल्या 'नर्सिंग होम' साठी त्यांनी चौदा हजार पांचशे रुपयांची देणगी दिली.

## लेडी रीडिंग फंड

जानेवारी १९२२ मध्ये लेडी रीडिंग या बाईंनी 'लेडी रीडिंग वुमेन ऑफ इंडिया फंड' उभारण्यासाठी एक आवाहन करणारे पत्रक काढले. या फंडाची उद्दिष्टे खाली नमूद केल्याप्रमाणे होती.

(१) लेडी हार्डिंग कॉलेज, दिल्ली या संस्थेस मदत करणे.

(२) सिमल्याच्या लेडी डफरीन हॉस्पिटल या संस्थेच्या कार्याचा व्याप वाढविणे.

(३) ऑल इंडिया नर्सिंग असोसिएशन या संस्थेतर्फे प्रशिक्षण देऊन कुशल हिंदी नर्सेस निर्माण करणे.

(४) दुःखनिवारण संघटना मोठ्या प्रमाणावर निर्माण करण्यासाठी केंद्र स्थापन करणे.

सर विठ्ठलदासांनी यापूर्वीच 'लेडी हार्डिंज गर्ल्स स्कूल' या संस्थेस देणगी दिली होती. परंतु त्यांच्यासारख्या उदार अंतःकरणास हे आवाहन कसं स्वस्थ बसू देणार! लगेच त्यांनी निधी पाठवून दिला.

## चांदोड संस्कृत पाठशाळा

चांदोड हे लहानसे शहर नर्मदानदीच्या काठी वसलेले. हे एक पवित्र तीर्थस्थान. ठाकरसींना या स्थानाबद्दल विशेष आत्मीयता. कारण मुंबईच्या प्लेगच्या सांथीच्यावेळी कांही दिवस त्यांच्या पत्नीच्या आजारात ते येथे येऊन राहिले होते. तिथल्या पुरोहितांना व ब्राह्मणसमाज यांना उपयुक्त पडावी व संस्कृतभाषेच्या अभ्यासाची अभिवृद्धि व्हावी म्हणून त्यांनी आपल्या वडिलांच्या स्मरणार्थ संस्कृत पाठशाळा स्थापन केली. 'शेठ दामोदर ठाकरसी मुळजी संस्कृत पाठशाळा' या नांवाची संस्था ३१ मार्च १८९६ रोजी सुरू करण्यात आली. ही चांदोड शहरातील महत्त्वाची संस्था असून तेथील रहिवाशांचो ती चांगल्या तऱ्हेने सेवा करीत आहे.

मुंबईच्या 'सोशल सर्व्हिस लीग' या संस्थेनें कामगारांसाठी 'वर्किंगमेन्स इन्स्टिटयूट' स्थापन केली. या संस्थेच्या हॉलसाठी पंचवीस हजारांची रक्कम दिली.

होतकरू विद्यार्थी मुंबई विद्यापीठाला संलग्न असलेल्या कॉलेजात उच्च शिक्षण घेऊ इच्छित होते. परंतु शिक्षणासाठी लागणारा संपूर्ण खर्च सोसण्यास आर्थिक दृष्ट्या असमर्थ असणाऱ्यांच्या गरजपूर्तीसाठी 'एज्युकेशन फंड फॉर कॉलेज स्टुडन्टस्' नांवाचा फंड स्थापन केला.

सर विठ्ठलदास सत्त्वशील गृहस्थ होते. मदतीसाठी त्यांच्याकडे गेलेला याचक कधीच विन्मुख परत आला नाही. परंतु हा दाता सारखा देतच राहिला. त्याची गणतीच करता येत नाही.

पांचगणी–महाबळेश्वरनजीक असलेल्या वाई शहरातून स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता चांगला नव्हता. त्यांच्या आईचे निधन तिथं झालं होतं. त्यामुळे त्या रस्त्याकडे त्यांचं लक्ष वेधलं. तो चांगला तयार करण्यासाठीही अडीच हजारांची रक्कम वाई म्युनिसिपालिटीला दिली. प्रेताचे दहनविधी पूर्ण होईपर्यंत लोकांना थांबण्याची सोय नव्हती म्हणून स्मशानभूमीत धर्मशाळा बांधण्याचे ठरले. त्या रस्त्याला 'सर विठ्ठलदास ठाकरसी रोड' हे नांवही दिले.

अशा ह्या विभूतीचा लोकहितकर्ता म्हणून नांवलौकिक झाला. त्यांच्यातील औदार्याचा, दयेचा, माणुसकीचा झरा उदार देणग्यांच्या रूपाने वाहत होता. त्यांना संपत्ती कधीच कमी पडली नाही.

संपत्तीचा संचय सर्वजण करतात, परंतु त्या संपत्तीचा विनियोग विधायक कार्यासाठी करण्याची दानत सर्वांकडं नसते. ती दानत लाभली सर विठ्ठलदासांना.

त्यांच्या औदार्याच्या छायेतील शीतलता सर्वांना जीवनभर संतोष देत राहील. त्यांनी उघडलेल्या दानछत्राखाली हजारो याचक, पांथस्थ विसावा घेतील. त्यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्तानं वाहिलेली आमची ही छोटीशी शब्दांजली.

# श्रीमती प्रेमलीला ठाकरसी—औदार्याची छाया

—विमलकीर्ती स. महाजन एम. ए., एम. एड.

जगाला अहिंसेचं तत्त्वज्ञान सांगणाऱ्या गौतमबुद्धाची बोधगया, अठरापगड जातीतील आबालवृद्धांना मऱ्हाठी बोलीतून भगवान श्रीकृष्णांचा दिव्य गीताधर्म सांगणाऱ्या ज्ञानेश्वरांची आळंदी, हरिकथानिरूपणातून समाजाला रोखठोक व्यवहार शिकविणाऱ्या रामदासांचा सज्जनगड अशी एक ना दोन, अनेक ठिकाणे दाखविता येतील की ज्या ठिकाणी विभूतींनी वास्तव्य केलं म्हणून त्यांना तीर्थाचं माहात्म्य प्राप्त झालं, तसंच श्री. ना. दा. ठाकरसी विद्यापीठाच्या भूतपूर्व उपकुलगुरु श्रीमती प्रेमलीलाबेन ठाकरसी यांच्या कर्तृत्वानं या विद्यापीठाचं माहात्म्य वाढलं.

## जन्म व बालपण

प्रेमलीलाबेन यांचा जन्म कोठवाडात राजकोट येथे ८ जानेवारी १८९४ साली झाला. त्याकाळी मुलीचा जन्म ही मोठी कौतुकाची गोष्ट नव्हती. पण ही मुलगी इतकी भाग्याची की तिच्या आई-वडिलांना ती परमेश्वरानं दिलेली एक अमोल भेट वाटली. असतं एखाद्याचं भाग्य.

प्रेमलीलाबेनचं मातृभाषेत म्हणजे गुजराथीत लोकल-बोर्डाच्या शाळेत प्राथमिक शिक्षण झालं. तत्कालिन सामाजिक परिस्थितीमुळे मुलींना त्यापुढचं शिक्षण मिळणं ही दुर्मिळ गोष्ट होती.

## विवाह व शिक्षण

वयाच्या २० व्या वर्षी त्यांचा सर विठ्ठलदास ठाकरसी या मुंबईच्या श्रीमंत उद्योगपतीबरोबर विवाह झाला. सर विठ्ठलदास हे केवळ धनाढ्य उद्योगपतीच नव्हते, तर त्यांना समाजसेवेचीही आवड होती. स्त्रीचा शिक्षणाच्या द्वारा सर्वांगिण विकास करावा असं त्यांना वाटे. अशा पतीच्या सान्निध्यात आल्यावर प्रेमलीलाबेन यांच्या उच्च शिक्षणास प्रारंभ झाला. इंग्रजी, संस्कृत व संगीत यांचे शिक्षण त्या त्या क्षेत्रातील अनुभवी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली सुरू झाले. सर विठ्ठलदासांच्या कार्याचा व्याप एवढा मोठा होता की, औद्योगिक, राजकीय, सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रांतील अनेक लहानमोठ्या अधिकाराच्या व्यक्तींची त्यांच्याकडे सारखी वर्दळ असे. त्यामुळे अनायासे प्रेमलीलाबेनचा बहुश्रुतपणा वाढला.

## विवाहपूर्व एक पत्र

प्रेमलीलाबेन यांचा विवाह होण्यापूर्वी सर विठ्ठलदासांनी त्यांना एक पत्र लिहिलं होतं. त्या पत्रातून त्यांनी आपल्या भावी पत्नीला असा मोलाचा उपदेश केला. की, “माणसानं निःस्वार्थीपणानं समाज-सेवा करावी. सुखासीनतेचा त्याग करावा. सर्वसामान्यपणे ऐश्वर्य व भौतिक सुविधा प्राप्त झाल्यावर माणसांची भोगवृत्ती, शारीरिक भोग किंवा सुखासीनता हा पुरुषार्थ नव्हे.” त्यासाठी त्यांनी प्रेमलीलाबेनच्या समोर ‘सेवासदन’ संस्थेच्या निर्मात्या श्रीमती रमाबाई रानडे यांचा आदर्श ठेवला.

ज्या वयात सर विठ्ठलदासांनी प्रेमलीलाबेनना उपदेश केला ते वय महत्त्वाचं आहे. त्या अवघ्या २० वर्षांच्या होत्या. त्या वयात यौवनाच्या उंबरठ्यावर माणूस वावरत असतो. वृत्ती स्वप्नाळू असतात. अनुभव नसला तरी उत्साह अंगात शिगोशिग भरलेला असतो. जीवनाबद्दल जिज्ञासा अन कुतूहल मनात असतं, पण त्याबरोबर ते वय संस्कारक्षमही असतं.

सर विठ्ठलदासांच्या पत्रातून केलेल्या उपदेशाचा प्रेमलीलाबेन यांच्या मनावर गहिरा परिणाम झाला आणि आज त्यांनी केलेल्या महनीय कामगिरीला त्याच उपदेशातून दिशा मिळाली असं म्हटलं तर अतिशयोक्ती होऊ नये.

## अपूर्व योग

इ. स. १९१७ मध्ये सर विठ्ठलदास यांनी प्रेमलीला-बाईना बरोबर घेऊन पुणे जिल्ह्यांतील हिंगणे येथील Hindu Widow's Home या संस्थेला भेट दिली. त्याच सुमारास महर्षी अण्णासाहेब कर्वे यांनी महिला विद्यापीठाचे लहानसे रोपटे नुकतेच लावले होते. (त्यावेळी हजेरीपटावर चार विद्यार्थिनी होत्या.)

त्यानंतरच्या काळांत महर्षी कर्व्यांच्या आणि सर विठ्ठलदासांच्या सहप्रयत्नानं जी भारतातील एकमेव व जगातील अगदी मोजक्या संस्थांपैकी एक अशी महिला विद्यापीठासारखी संस्था निर्माण व्हावयाची होती त्याची ही नांदी होती.

नंतर जागतिक दौरा करण्यासाठी सर विठ्ठलदास प्रेमलीलाबेन यांना घेऊन १४–३–१९१९ मध्यें बोटीने निघाले. जपानमधील मुक्कामांत त्यांनी तेथील महिला विद्यापीठास भेट दिली. जपानच्या महिला विद्यापीठाच्या धर्तीवर महर्षि कर्व्यांनी पुण्यास महिला विद्यापीठाची स्थापना केली.

सर विठ्ठलदासांच्या प्रकृती–अस्वास्थ्यामुळे परदेश-दौरा मध्येच कमी करून नोव्हेंबर १९१९ मध्यें हें दांपत्य हिंदुस्थानांत आलें. भारतीय स्त्रीच्या उन्नतीसाठी काही उपाय करावा हा निर्णय त्यांच्या मनांत झालेला होता. सर विठ्ठलदासांनी महर्षि कर्व्यांना भेटीसाठी घरी बोलावून स्वेच्छेनं १५ लाख रुपयांची उदार देणगी महिला विद्यापीठासाठी दिली. त्या भेटीनं कर्वे अक्षरशः भारावून गेले. त्या देणगीच्या शर्ती अशा—

(१) महिला विद्यापीठास सर विठ्ठलदासांच्या मातोश्रींचं नांव द्यावं. ते श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ म्हणून ओळखलं जावं.

(२) महिला विद्यापीठाचें कार्यालय पुण्याहून मुंबईस न्यावें.

कोणतंही चांगलं कार्य वित्तासाठी अडून राहात नाही. एका महान द्रष्ट्याचे स्वप्न साकार करण्यासाठी एका उदार दात्याची देणगी फलद्रूप झाली.

## कार्यारंभ

इ. स. १९२० मध्ये श्रीमती प्रेमलीलाबेन यांची महिला विद्यापीठाच्या सीनेटवर नियुक्ती झाली. त्यावेळी त्यांचं वय जेमतेम २६ वर्षांचं. एवढ्या लहान वयात जबाबदारी घेण्यास प्रेमलीला तयार होईनात. त्या प्रसंगी विठ्ठलदासांनी त्यांना उपदेश केला, की “जबाबदारी स्वीकारून ती पार पाडूनच शहाणपण शिकता येते, जबाबदारीतून पळून दूर जाऊन नाही.” पलायनवादाचं तत्त्वज्ञान त्यांना नामंजूर होतें. प्रेमळ पतीच्या प्रोत्साहनानं त्यांनी ती जबाबदारी स्वीकारली. त्या घटकेपासून सतत ५० वर्षे त्यांचा संस्थेशी निकट संबंध आहे.

## दुर्दैवाची कुऱ्हाड–वैधव्य

इ. स. १९२२ सालीं अलसरच्या दुखण्यानं त्या शस्त्रक्रियेनंतर विठ्ठलदासांचा अंत झाला. लेडी प्रेमलीलाबेन यांच्यावर वैधव्याची कुऱ्हाड कोसळली. अशा घणाघाती धक्क्यातून डोके वर काढणे कठीण, पण सर्व उपक्रमांतून त्यांनी अंग काढून घेतलं व लवकरच कार्याला आरंभ केला. त्यांच्या कर्तृत्वसंपन्न पतीनं त्यांच्यासमोर ठेवलेल्या ध्येयाने व शिकवणुकीने त्यांना धीर आला. भगवद्गीतेच्या संदेशाने त्यांना दैनंदिन जीवनात आधार अन् शांती दिली.

**सुखदुःखे समे कृत्वा लाभालाभौ जयाजयौ।**
**ततो युद्धाय युज्यस्व नैवं पापमवाप्स्यसि ॥**

त्यांच्या पतीनं संस्थेला देणगी दिलेली व पतीच्या पूज्य मातोश्रींचं या विद्यापीठास नाव असल्यामुळं या संस्थेबद्दल त्यांच्या मनांत कुटुंबाची भावना निर्माण झाली. पतीनं पाहिलेल्या स्वप्नांना सत्यसृष्टीत आणण्या-साठी त्यांनी महिला विद्यापीठाच्या कार्याला वाहून घेतलं. त्या कार्यांत त्या इतक्या गढून गेल्या की मातेच्या ममतेनं त्यांनी महिला विद्यापीठास वाढविले.

## मुंबई विद्यापीठाचे स्थलांतर-मुंबई हे कार्यक्षेत्र

आज एस. एन. डी. टी. विद्यापीठाच्या भव्य इमारती वसल्या आहेत ती जागा इ. स. १९३६ मध्यें त्यावेळचे व्हाइसरॉय लॉर्ड विलिंग्डन व मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड ब्रेबॉर्न यांच्या मदतीने घेतली. या कामी त्यावेळचे व्हॉइसरॉयच्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलचे सदस्य सर जगदीश प्रसाद यांची फार मोलाची मदत झाली.

## कार्याचा गौरव

इ. स. १९४९ साली महिला विद्यापीठास सनदशीर मान्यता मिळाली. १९५९ मध्ये प्रेमलीलाबेन या पहिल्या उपकुलगुरु झाल्या. इ. स. १९५३ ला त्यांना एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठाची बहुमानाची पदवी बहाल

करण्यात आली. बनारस हिंदु विद्यापीठाच्या स्थापनेच्या कालापासून त्या संस्थेशी प्रेमलीलाबेनचा संबंध होता, त्या विद्यापीठानं देखील १९५६ साली Doctor of Literature ची पदवी त्यांना बहाल केली.

## औदार्य

इ. स. १९६६ मध्यें महिला विद्यापीठाच्या सुवर्ण-महोत्सवप्रसंगी प्रेमलीलाबेननी सहा लक्ष रुपयांची देणगी विद्यापीठास दिली.

संस्था नांवारूपाला आणून चालविणं सामान्य काम नसतं; त्याला तितक्याच जबर निष्ठेची-मेहनतीची आवश्यकता असते. 'आधी केले मग सांगितले' या उक्तीप्रमाणे त्या वागल्या. स्वतः द्रव्यरूपी देणग्या देऊन थांबल्या नाहीत. स्वतःच्या जीवनाची चार तपे संस्थेच्या उत्कर्षासाठी वेंचली. हा त्याग, ही सेवा कोणत्या परिमाणानं मोजता येईल ? तो जीवनाचा एक यज्ञ होता, ते एक महान दान होतं.

## वटवृक्ष–एक आख्यायिका

सध्या ज्या ठिकाणी महिला विद्यापीठाच्या इमारती वसल्या आहेत त्या आवारात एक वटवृक्षाचे रोपटे होते. ते रोपटे वाढू दिल्यास इमारतींना अडथळा होईल म्हणून ते काढून टाकण्याचं ठरलं. पण प्रेमलीलाबाईंनी ते तोडून टाकण्यास परवानगी दिली नाही. त्या म्हणाल्या, "वाढणारा वृक्ष वाढू द्यावा, त्याला खची करू नये." आज तो वटवृक्ष कित्येक पटीनं वाढला. प्रेमलीलाबेन यांच्या मनःचक्षूसमोर विद्यापीठाच्या विस्ताराचा चित्रपट सरकत असेल. वटवृक्षाची पूर्ण वाढ झाल्यावर जशा त्याच्या पारंब्या वाढतात, त्यातून त्याला जीवनरस मिळतो, तद्वत आज ह्या विद्यापीठाच्या निरनिराळ्या शाखांतून त्याचा विस्तार वाढत आहे. प्रेमलीलाबेन यांनी तन-मन-धन अर्पण करून विद्यापीठरूपी वृक्षाची जोपासना केली. आज वर्धिष्णु महिला विद्यापीठाचं प्रतीक म्हणून तो वटवृक्ष आपल्या वैभवानं संस्थेच्या आवारात उभा आहे.

## त्रिवेणी–संगम

हा सर्व विस्तार तीन महान व्यक्तींच्या कार्याचा त्रिवेणी–संगम आहे. महर्षी कर्व्यांचं द्रष्टेपण, सर विठ्ठल-दासांचं दातृत्व, आणि प्रेमलीलाबेन यांचं आदर्श प्रशासन. गंगा, यमुना आणि सरस्वती या नद्यांचा संगम जसा पवित्र तसाच हा संगम आहे. स्त्रीशिक्षणाच्या कार्याची ही निःशब्द क्रांती निमूटपणे चालली आहे.

## इतर कार्यक्षेत्रे

प्रेमलीलाबेन यांनी या विद्यापीठावर अपत्यवत प्रेम केलं. त्याशिवाय इतर संस्थांशीही त्यांचा संबंध आला. (१) कस्तुरबा गांधी नॅशनल मेमोरियल ट्रस्ट (२) वनिता विश्राम, मुंबई–सुरत (३) सेवासदन, पुणें.

या संस्थांना त्यांच्या सेवेचा व प्रशासनाचा लाभ मिळाला. कस्तुरबा गांधी नॅशनल मेमोरियल ट्रस्टच्या त्या चेअरमन म्हणून त्यांनी दहा वर्षांपेक्षा अधिक काळ काम पाहिलं. त्यांच्या कारकिर्दीत त्या संस्थेनं पीडित स्त्रियांना मदत करण्याचं कार्य केलं.

## प्रेमलीलाबेनचं व्यक्तित्व

एवढी गजान्त लक्ष्मी अन ऐश्वर्य घरांत नांदत असतांना त्यांच्या मनाला गर्व कधी शिवला नाही. पददलितांचं कल्याण हेच ध्येय. येरवडा, पुणे येथील त्यांच्या प्रासादतुल्य 'पर्णकुटी' मध्ये त्यांनी मुलींचं वसतीगृह चालविलं होतं. सर विठ्ठलदास चॅरिटेबल ट्रस्ट व प्रेमलीलाबेन ठाकरसी चॅरिटेबल ट्रस्ट या दोन संस्थांच्या विद्यमाने सध्या विधवा, विद्यार्थी, वृद्ध–अपंगांना जाती-वर्णभेदाचा प्रपंच न करता मदत देण्याचं कार्य चालू आहे.

त्याचं स्वतःचं खाजगी जीवन निर्मळ, साधं, प्रामाणिक अन विनयशील आहे. त्या वृत्तीनं धार्मिक आहेत. सहानुभूती, सहनशीलता, दयाळूपणा हे त्यांच्या स्वभावाचे विशेष पैलू आहेत.

## कृतज्ञता

आमच्यासारख्या हजारो विद्यार्थिनींना त्यांच्या औदार्याचा अन अनुभवाचा फायदा झाला आहे. या प्रसंगी केवळ कृतज्ञता व्यक्त करण्यापलिकडे आमच्या हाती काय आहे ? त्यांना दीर्घायुष्य लाभो अन जन्मशताब्दी साजरी करण्याचं भाग्य आम्हांला लाभो हीच परमेश्वराजवळ प्रार्थना !

# श्रीमती सीताबाई अण्णिगेरी

लेखिका : सौ० सुमती केतकर

श्रीमती सीताबाई अण्णिगेरी एस. एन. डी. टी. कन्याशाळेच्या मुख्याध्यापिकापदावर ता. १ जानेवारी १९२५ रोजी रुजू झाल्या. सतत ३१ वर्षे म्हणजे १९५८ पर्यंत त्या पदावर होत्या.

सीताबाईंचा जन्म २५ मार्च १८९३ रोजी धारवाड येथे झाला. त्या काळच्या पद्धतीप्रमाणे वयाच्या दहाव्या वर्षी त्यांचा विवाह झाला. परंतु अवघ्या दोन वर्षांतच त्यांच्यावर वैधव्याची कुऱ्हाड कोसळली. त्याच सुमारास श्रीमती पार्वतीबाई आठवले पुण्याच्या अनाथ बालिका-श्रमासाठी वर्गणी गोळा करण्यासाठी धारवाड येथे गेल्या असता, त्यांच्या सांगण्यावरून सीताबाई हिंगणे येथे आश्रमात आल्या. १९१६ त त्या महिला विद्यापीठाची प्रवेशपरीक्षा पास झाल्या. त्या कॉलेजच्या दुसऱ्या वर्षाच्या वर्गात शिकत असतानाच त्यांना परदेश-प्रवासाची एक उत्तम संधी चालून आली. मुंबईतील सुविख्यात उद्योगपती, शिक्षणप्रेमी, दानशूर कै. सर विठ्ठलदास ठाकरसी व लेडी प्रेमलीलाबाई ठाकरसी यांच्या-बरोबर जपान, चीन, अमेरिका, लंडन इ. देशांना भेट देण्याची संधी मिळाली. परत आल्यानंतर त्यांनी आपले शिक्षण पुरे केले व मराठी व शास्त्र हे विषय घेऊन जी. ए. 'गृहितागमा' झाल्या. शिक्षण पुरे झाल्यावर त्यांनी आपले सारे जीवन संस्थेच्या कार्यासाठी खर्च करण्याचे ठरविले. ता. १ जानेवारी १९२५ रोजी त्या एस. एन. डी. टी. कन्याशाळेच्या मुख्याध्यापिकेच्या पदावर रुजू झाल्या. विद्यापीठाच्या तत्त्वाप्रमाणे सर्व कारभार मराठीतून चालत असे. त्यामुळे मुलींच्या संख्येत वाढ होत नव्हती. तेव्हा सीताबाई नगरपालिकेच्या शाळांतून जवळपासच्या विभागांतून स्वतः हिंडल्या. घरोघरी जाऊन पालकांना विनंती करून शाळेचे महत्त्व पटवून दिले, व आनंदाची गोष्ट म्हणजे त्यांच्या या प्रयत्नांना भरघोस यश मिळाले. शाळेची आनंदभुवन ही पहिली भाड्याची इमारत अपुरी पडू लागली व शाळेसाठी सिक्कानगरसमोरील वसनजी हाऊस ही भव्य इमारत भाड्याने घेतली. मध्यंतरी १९३२, ३३ साली त्यांनी अमेरिकेतील मिल्सकॉलेजात बी. ए. ची पदवी संपादन केली. त्यांना परदेशातील जीवनाचा जवळून अभ्यास करता आला. त्यांच्या अनुभवाचा फायदा वेळोवेळी संस्थेला मिळाला आहे.

कै. गुरुवर्य अण्णासाहेब कर्वे यांचा ८१ वर्षांचा व ९१ वा वाढदिवस सीताबाईंच्या पुढाकाराने उत्तम प्रकारे पार पडला. त्यांच्या ९१ व्या वाढदिवसानिमित्त १ लाखाची थैली अर्पण करण्याचे ठरले व त्यासाठी सीताबाईंनी अतोनात प्रयत्न केले व त्यांना यश मिळाले.

सीताबाईंच्या कारकीर्दीत कन्याशाळेला सरकारी मान-मान्यता मिळाली. त्यांची सेवा लक्षात घेऊन महाराष्ट्र सरकारने १९४९ साली जे. पी. हा किताब देऊन ऑनररी प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट म्हणून नेमणूक केली. शाळेचा रौप्यमहोत्सव त्यांनी मोठ्या उत्साहाने पार पाडला. हे त्यांच्या कष्टांचे फळच होय. आपल्या कारकीर्दीत त्यांनी प्रयोगशाळा, ग्रंथालय, इ. शैक्षणिक साधनांनी शाळा सुसज्जित करून टाकली. सीताबाई शिस्तीच्या मोठ्या भोक्त्या होत्या. मुलींच्यावर त्यांची करडी नजर असे. शिक्षण-क्षेत्रात ज्या सुधारणा वेळोवेळी झाल्या त्या सर्व त्यांनी आपल्या शाळेत सुरू केल्या. ३१ वर्षे कन्याशाळेत कर्तबगारीची कार्ये करून १९५८ साली सीताबाई कन्याशाळेच्या मुख्याध्यापिकेच्या पदावरून सेवानिवृत्त झाल्या व आपली अधिकारसूत्रे सुयोग्य अशा सौ. प्रतिभा भवाळकर यांच्या हाती सोपविली. त्या सीताबाईंचीच परंपरा आज पुढे चालवीत आहेत.

कन्याशाळेच्या कार्याशिवाय सीताबाईंचा इतर सामाजिक संस्थांशीही संबंध होता. हिंगणे स्त्री–शिक्षण संस्था, उद्यम मंडळ, मुंबईतील हिंद महिला समाज, आर्य महिला समाज या संस्थांच्या त्या एक जुन्या कार्यकर्त्या म्हणून ओळखल्या जातात. महाराष्ट्र स्टेट कौन्सिल फॉर चाइल्ड वेल्फेअर या संस्थेच्या सुमारे दहा वर्षे त्या ऑनररी सेक्रेटरी होत्या. त्यांनी विमा-एजंटचे काम करून हिंगण्याच्या संस्थेस पैसा मिळवून दिला. भाऊबीजफंडाची जबाबदारी त्यांनी स्वीकारली आहे. युनिट ट्रस्टचे कामही त्या करतात. या सर्व कामांच्या पसाऱ्यामुळे वयाच्या ८१ व्या वर्षीही त्या कधी स्वस्थ बसलेल्या दिसणार नाहीत.

साधी राहणी व उच्च विचारसरणी हे त्यांचे ब्रीद आहे. कशिदा काढणे, विणकाम, शिवणकाम यांची त्यांना आवड आहे. सतत काहीतरी काम करीत राहाणे हा त्यांचा स्वभावधर्म आहे. हाती घेतलेले काम तडीस नेण्याची जिद्द, महत्त्वाकांक्षा, चिकाटी, सतत उद्योग या गुणांमुळे त्या यशस्वी झाल्या आहेत. त्यांच्या सुदैवाने त्यांना उत्तम आरोग्य लाभले. त्यांचे मार्गदर्शन कन्याशाळेला लाभो व त्या शतायु होवोत, ही इच्छा परमेश्वराजवळ आम्ही प्रदर्शित करतो.

# सौ. प्रतिभा भवाळकर–एक झंझावाती व्यक्तिमत्त्व

लेखिका :—विमलकीर्ती स. महाजन

[ राष्ट्रीय पारितोषिक देऊन गौरविलेल्या एक मुख्याध्यापिकेच्या कर्तृत्वाची वाटचाल. ]

भारतीय स्वातंत्र्याच्या रजतजयंतीच्या वर्षी आमच्या शाळेच्या ( एस. एन. डी. टी. कन्याशाळा, गिरगांव, मुंबई. ) मुख्याध्यापिका सौ. प्रतिभा भवाळकर यांना राष्ट्रीय शिक्षक म्हणून राष्ट्रपती पुरस्कार मिळाला. शाळेच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिण्याजोगी ही घटना होय. बाईंच्याही जीवनातील त्यांच्या उज्ज्वल यशाचा परमोत्कर्षबिंदू म्हणूनही ह्या घटनेचा उल्लेख करता येईल. त्यांच्या विद्यार्थिनीवर्गाला व त्यांच्या मार्गदर्शनाखाली काम करणाऱ्या शिक्षकवर्गाला देखील ही घटना अभिमान वाटणारी आहे.

५ सप्टेंबरला पुरस्कार जाहीर झाला त्यावेळी आनंदानं भारावलेल्या बाईंनी शिक्षकवर्गाला उद्देशून भाषण केलं. "आजचं हे यश, हा पुरस्कार माझा नाही. हा तुमचा सर्वांचा आहे. तुमच्या सहकार्यानं मी ही धुरा वहात आहे." हे जरी त्यांनी कृतज्ञता व्यक्त करतांना म्हटलं तरी त्याचबरोबर हेही सत्य आहे की बाईंचं कर्तृत्व, जिद्द, तळमळ या त्रिविध शक्तींनी त्यांनी यशाला ओढून आणलं, हे नाकबूल करून चालणार नाही.

## व्यक्तित्वाची घडण

त्यांचं वैयक्तिक जीवन साधं आहे. अनेक अडचणींना तोंड देत झगडत त्यांना आपलं ईप्सित साध्य करावं लागलं. त्यांचं उच्च शिक्षण विलिंग्डन कॉलेज व फर्ग्युसन कॉलेजमध्ये झालं. त्या बी. ए., एम. एड. झालेल्या आहेत.

विद्यार्जनाच्या काळात त्यांच्या मनावर ज्या व्यक्तींचा ठसा उमटला व ज्यामुळे आज त्या एवढ्या नांवारूपाला आल्या त्यांत कै. डी. जी. कर्वे, प्रा. रा. श्री. जोग व श्री वामनराव खानोलकर यांचा त्या आपल्या संभाषणातून उल्लेख करतात.

## कर्तृत्वाची वाटचाल

तीस वर्षांहून अधिक काळ त्या शिक्षणक्षेत्रांत वाटचाल करीत आहेत. जून १९४२ मध्यें त्यांनी सरस्वतीच्या मंदिरात सेवेचं व्रत सुरू केलं. प्रथम एल्फिन्स्टन हायस्कूलमध्ये शिक्षिका म्हणून नोकरी केली. त्या सरकारी नोकरीत फार काळ राहिल्या नाहीत. इ. स. १९४५ साली त्या एस. एन. डी. टी. कन्याशाळेंत दाखल झाल्या. इ. स. १९५८ मध्ये इथेच मुख्य प्राध्यापिका झाल्या. कै. महर्षि अण्णासाहेब कर्वे यांच्या संस्थेबद्दल प्रथमपासूनच त्यांच्या मनात आपुलकी होती, जिव्हाळा होता. नोकरीच्या निमित्तानं ह्या संस्थेत आल्यावर त्यांनी स्वतःला या संस्थेच्या कार्याला वाहून घेतलं.

विद्यार्थिनींचा बौद्धिक विकास व कन्याशाळेची भरभराट हेच जणू त्यांच्या जीवनाचं एकमेव प्रयोजन झालं होतं. त्याच्या आड येणाऱ्या संकटांना तोंड द्यायचं, त्यातून मार्ग काढायचा यापरता दुसरा ध्यास नव्हता. माणसाला आपल्या जीवनातील संगीताचा सूर सांपडावा लागतो. त्यालाच आपण प्रयोजन म्हणू. ह्या प्रयोजनाच्या प्रतिष्ठेसाठी त्याला अविश्रांत श्रम करावे लागतात. त्याला अव्यभिचारी निष्ठेचं अधिष्ठान असावं लागतं. अशा गुणांनी संपन्न असलेल्या व्यक्तीच आपल्या जीवनात काही भरीव कार्य करू शकतात.

ज्ञानार्जनाची व अध्यापनाची परंपरा आपल्या भारतांत उपनिषदकालाइतकी प्राचीन आहे. या प्राचीन परंपरेची कावड पुढं नेण्याचं कार्य त्यांनी केलं. त्यांच्या कार्याचा गौरव होण्याचं सौभाग्य त्यांना लाभलं हा त्या निष्ठेचा गौरव आहे. जबाबदारीचा व्याप पाहून त्या डगमगल्या नाहीत. अडचणीवर त्यांनी मात केली. त्यांना कधीच पराभव पत्करावा लागला नाही असं आपण म्हणू शकतो का ? नाही. पराभव व विजय ही व्यक्तीच्या जीवनात आलटून-पालटून येतच राहातात. त्यांत हाय खाऊन किंवा बेहोष होऊन कार्यापासून परावृत्त होतात ती सामान्य माणसे आणि त्यातूनही पुढे-पुढे पावले टाकीत जातात ती माणसं असामान्यत्व मिळवतात. समाजाच्या कौतुकाचा विषय होतात. 'राष्ट्रपति पुरस्कार' हा त्यांच्या जीवनातील गौरवाचा क्षण. पण तो गौरव झाला नसता तरी त्यांच्या कार्याचं मोल कमी नव्हतं आणि आताही नाही.

गिरगांव हा दाट वस्तीचा मुंबईतील भाग. त्यामुळे ह्या शाळेतील हजेरीपटावर बहुजनसमाजातून येणाऱ्या व आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गातील विद्यार्थिनी बहुसंख्य आहेत त्यांची बौद्धिक पातळी वरच्या दर्जाची नाही म्हणून बाई प्रवेश नाकारीत नाहीत. सामान्य विद्यार्थिवर्गाची कुणीतरी सोय लावलीच पाहिजे, म्हणून प्रवेशाबाबत त्यांनी हा उदार दृष्टिकोण ठेवला आहे. समाजातील स्वतःस समजणाऱ्या वरच्या दर्जाच्या कुटुंबातील विद्यार्थ्यांना कुणीही सहज प्रवेश देतात. पण गैरसोय होते इतरांची. ज्यांची शिकण्याची दुर्दम्य इच्छा आहे त्यांचा त्या कधीच हिरमोड करीत नाहीत. त्यांना शक्य असेल तेवढी मदत करतात. अनेक गुंतागुंतीचे प्रश्न हाताळण्यासाठी लागणारी सहृदयता त्यांच्या ठायीं आहे. व्यक्तीच्या कल्याणासाठी प्रसंगी नियमांना मुरड घालण्याचं धैर्य त्यांच्यापाशी आहे.

शिक्षकवर्गाच्या बाबतही त्या शिस्तीनं कडक आहेत. कधी कठोर बोलून तर कधी मायेच्या, समजावणीच्या स्वरात सांगून त्या कामं करून घेतात.

स्वभावानं त्या निगर्वी, मनमोकळ्या आहेत. बोलायला लागल्या की दिलखुलास चर्चा करतील की ऐकणाऱ्याचं भान हरपून जावं. पण तसाच प्रसंग असेल तर गंभीर होऊन कार्यारंभ करतील–त्यात गढून जातील. पाहाणाऱ्याला त्यांच्या स्वभावातील आगळ्याच पैलूंची शलाका आढळेल.

विद्यार्थिनींना पैशाअभावी शिक्षण थांबवावं लागू नये म्हणून इ. स. १९६५ पासून आमच्या शाळेत 'अल्पबचत योजना' सुरू केली. या योजनेचा विस्तार क्रमाक्रमाने वाढत गेला व इ. स. १९७० साली ही शाळा 'बचतशाळा' म्हणून महाराष्ट्रशासनाच्या अल्पबचत संचालनालयाने घोषित केली.

शहरी वातावरणात प्रलोभनं फार. किरकोळ खर्चासाठीं पालकांनी दिलेले पैसे विद्यार्थिनी हौशीनं चैनीच्या वस्तू खरेदी करण्याकरिता खर्च करतात. वाया जाणारे हे पैसे अल्पबचत योजनेमुळे प्रत्येक विद्यार्थिनीच्या खात्यात जमा होऊ लागले. उधळपट्टीला आळा बसला. पैसे जमविण्याची गोडी निर्माण झाली. मुलींच्या दृष्टीनं ही योजना खऱ्या अर्थानं कल्याणकारी योजना झाली.

बाईंची अशी धारणा आहे की अल्पबचत खात्यात जमा होणाऱ्या रकमेपेक्षा कुमारावस्थेतील विद्यार्थ्यांवर राष्ट्रीय भावनेचे होणारे संस्कार फार मोलाचे आहेत. या संस्थेतील शिक्षकवर्ग व विद्यार्थिनी शासनाची एक योजना एवढ्या निष्ठेनं कार्यवाहीत आणीत आहेत.

व्यक्तिजीवन संपन्न करण्यासाठी स्वावलंबन, राष्ट्राभिमान, सहकार्य इ. गुणांची फार गरज आहे अल्पबचत योजनेच्या उपक्रमातून हे साध्य होत आहे हें पाहून बाईंच्या ध्येयाचं व योजनांचं क्षितिज अधिक व्यापक, अधिक विस्तृत होत आहे.

सर्व शाळा 'अल्पबचत शाळा' म्हणून मान्यता पावल्यामुळे १९७०-७१ या आर्थिक वर्षात अल्पबचत संचालनालयामार्फत पांच हजार रुपयांचं जादा अनुदान शाळेला मिळालं.

या उपक्रमातून कन्याशाळेचा विकास करण्याचं स्वप्न त्या पाहात आहेत. सध्या जिथं शाळा आहे तिच्या शेजारी असलेली जागा शाळेच्या विस्तारासाठी मिळाल्यास फार व्यापक योजना कार्यान्वित करण्याचा मानस आहे. गरीब व मध्यमवर्गीय विद्यार्थिनींना अभ्यासासाठी अद्ययावत सोयींनी युक्त मोठं वाचनालय, सुसज्ज प्रयोगशाळा, असेंब्ली हॉल व खेळाचं मैदान इत्यादी सुविधा उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न आहेत. त्यांची जिद्द पहाताच वाटतं की त्या आपल्या झंझावाती कारकिर्दीतच योजना सफल करतील.

अल्पबचत योजनेची थोडीशी आंकडेवारी पाहिली तर तिच्या यशस्वितेची कल्पना येईल.

डिसेंबर १९७१ मध्ये झालेल्या भारत-पाक युद्धाच्या निमित्तानं विद्यार्थिनींनीं समाजकार्य म्हणून आपल्या नातेवाइकांमध्ये प्रचार करून १२६० पुनरावर्ती ठेवींची ( Recurring Deposits ) खाती उघडली व लढाईच्या काळात ८५ हजार रुपये शाळेतर्फे गोळा करण्यात आले.

बृहन्मुंबईतील सर्व दुय्यम शाळांच्या सहकार्यानं अल्पबचत समिती प्रमुख ( Convenor ) म्हणून

त्यानी तीन आठवड्यांत १२ लाख रुपये गोळा केले. २६ जानेवारी १९७२ रोजी शिवाजीपार्कवर झालेल्या सोहळयात संरक्षणनिधीसाठी ३ लाख रुपये बाईंनी माननीय शिक्षणमंत्र्यांच्या उपस्थितीत जाहीर केले.

गिरगांव विभागातील दुय्यम शाळांच्या प्रमुख व सभासद म्हणून त्या ९ वर्षे काम करीत आहेत. निरनिराळया माध्यमांतून शिक्षण देणाऱ्या शाळांना एकत्रित आणण्यात त्यांनी यश मिळवलं आहे. ह्या विभागातील शाळांच्यातर्फे आयोजिलेले निरनिराळे शैक्षणिक उपक्रम सर्वांच्या सहकार्यानं पार पाडले जातात. उदा. भारत-पाक युद्धाच्यावेळी भरविलेलं 'बांगलादेश युद्ध' ह्या नांवाचं प्रदर्शन गिरगांव भागांतील सर्व-भाषिक विद्यार्थी, शिक्षक, मुख्याध्यापक या सर्वांनी बहुसंख्येनं भाग घेऊन यशस्वी केलं. त्यांत देणगी म्हणून जमा झालेले ६३० रु. 'सैनिक कल्याण' फंडाला दिले.

आंतरराष्ट्रीय शैक्षणिक वर्षाच्या निमित्तानं बृहन्मुंबई-तील मुलींच्या १०० शाळांतील सर्व शिक्षकवर्गाला एकत्रित आणण्यासाठी शिक्षकांचे विविध कार्यक्रम झाले. त्यांनी केलेल्या वस्तूंचे प्रदर्शन, खेळ, इत्यादी कार्यक्रम आयोजित करण्यात आले. ते सर्व यशस्वी रितीनं पार पाडले. या उपक्रमाच्या सेक्रेटरी म्हणून त्या काम पहात होत्या.

ह्या शाळेत 'विद्यार्थी कल्याण निधी'ची योजना गेल्या चार वर्षांपासून सुरू करण्यात आली आहे. शिक्षक दर महिन्याला या निधीसाठी स्वखुशीनं वर्गणी देतात. ह्या शाळेतर्फे 'भाऊबीज फंड' म्हणून गोळा केला जातो. व तो फंड हिंगणे येथील स्त्रीशिक्षण संस्थेला दिला जातो. गेल्या काही वर्षांत २५ हजार रु. दिले. भूकंप, दुष्काळ, पूर यांसारख्या आपत्तीच्या वेळीही राष्ट्राला फंड गोळा करून मदत करतात.

आजचा विद्यार्थी विशेषतः शहरांत वाढलेला, चौकस व ज्ञानाची अधिक माहिती असलेला असा आहे. त्याची जिज्ञासापूर्ती शिक्षकानं करायला हवीय. शिक्षकांनी पाठ्यपुस्तकापुरतं अध्यापन मर्यादित ठेवू नये. आपल्या विषयाचं चिंतन, मनन करून नवे नवे प्रयोग करावेत. शिक्षक व विद्यार्थी यांचा सहवास, सहकार्य, जितकं अधिक तितका विद्यार्थ्यांचा बौद्धिक विकास अधिक आहे, अशी बाईंची धारणा आहे.

प्रथम शिक्षिका व नंतर मुख्याध्यापिका या दुहेरी भूमिकेतून शालेय संस्थेत कार्य करीत असताना घेतलेला हा आढावा. हा कार्यांचा रंगपट खूपच विशाल व विस्तृत आहे.

सौ. भवाळकर ह्या उत्साही आहेत. त्या सदैव कार्यरत असतात. शाळेच्या जबाबदारीबरोबर इतर अनेक कार्ये त्या करीत असतात. स्वस्थता व कार्यशून्य आराम त्यांना माहीत नाही. कामात बदल करायचा म्हणजे विश्रांती हे त्यांचं तत्त्व आहे.

शाळेतील गर्लगाईडना काम करण्यास सांगून गेले वर्षी विद्यार्थिनींनी एका सैनिक कुटुंबाचा वर्षाचा खर्च रु. १५०० गोळा करून दिला.

सर्व सुखसोयी, वैभव हात जोडून उभे असूनही त्यांत त्यांचे मन रमलेले नाही. 'शारदेचं मंदिर' हीच त्यांची वास्तू, हेच त्यांचं घर. तिची सेवा करता करता इतर कोणतंही सुख घ्यायला त्यांना सवड नाही. साऱ्या विद्यार्थिनी हीच त्यांची अपत्यं. आपलं सारं जीवन त्यांनी शारदेच्या सेवेसाठी वाहिलं आहे.

अशा या आदर्श व्यक्तिमत्त्वाचा आदर कुणाला वाटणार नाही. श्रीमंतीचा थाट नाही, मोठेपणाचा अभिमान नाही, निरिच्छित, निःस्वार्थीपणे सेवा करीत जीवन घालवणं हेच त्यांच्या जीवनाचं एकमेव प्रयोजन झालंय, ध्येय झालंय.

पुढील जीवनमार्ग आक्रमीत असताना त्यांच्या आयुष्यांत त्यांच्या यशस्वी कार्याबद्दल राष्ट्रीय, जागतिक पारितोषिकं मिळावीत आणि अशा आदर्श व्यक्तित्वातून इतरांनाही प्रेरणा मिळावी हीच आमची अपेक्षा.

# शालेय जीवनाच्या स्मृती

कु. शकुंतला काळसेकर, माजी विद्यार्थिनी

वेळ किती झरझर निघून जाते, हे ती वेळ निघून गेल्यावर समजते व त्या काळातील आठवणी पुन्हा पुन्हा मनात येत राहतात. त्याचप्रमाणे शालेय जीवन केव्हा व कसे संपले, हे समजलेच नाही. आता शालेय जीवन संपल्यावर मात्र त्या काळातील आठवणींनी मन भूतकाळात रमते.

प्राथमिक शिक्षण संपवून जेव्हा मी या शाळेत प्रवेश केला, तेव्हा मला मी नवीन शाळेत जाणार म्हणून आनंद झाला होता. तेथील शिस्त कशी असेल याबद्दल भितीही वाटत होती. परंतु ती काही वेळच होती.

शाळेत गेल्यावर प्रथम परिचय झाला तो केतकरबाईंशी. त्यांच्या प्रेमळ बोलण्याने ही शाळा आमची आहे याची जाणीव करून दिली व माझ्या माध्यमिक शिक्षणास सुरवात करून दिली. त्यांनी दिलेल्या संदेशाप्रमाणेच यशापयशाची चिंता न करता अभ्यास हेच ध्येय मानून एकएक इयत्ता पुरी करीत एस. एस. सी. पास झाले.

कपाळी कुंकू व हातात बांगड्या हे मी शाळेत असताना शाळेचा नियम म्हणून पाळत होते. परंतु आता ते इतके अंगवळणी पडले की, मी ते नियम नियमित पाळत आहे.

कोणतीही गोष्ट इतरांपेक्षा जरा चांगली झाली की दुमाळेबाई शाबासकी देत व कौतुक करीत. त्यामुळे काम व अभ्यास करण्यास अधिक प्रोत्साहन मिळे.

महाजनबाईंच्या थोड्याच महिन्यांच्या सहवासानेही त्यांनी आमची मने आकर्षित करून घेतली होती. त्यांचा नेहमीच हास्याने फुललेला चेहरा डोळ्यापुढे उभा राहतो. शिकविताना आपल्या जीवनातील अनेक अनुभव त्यांनी आमच्यापुढे गोष्टीरूपाने ठेवले. त्यामुळे आम्हाला माहीत नसलेल्या पुष्कळ गोष्टी समजून आल्या. त्यांच्याबद्दल सर्वात जास्त मनात भरणारी गोष्ट म्हणजे मुलींशी एकरूप होऊन बोलणे.

खेळाच्या सामन्यांच्या वेळची गोष्ट. 'माठ फोडणे' या स्पर्धेत एकही मुलगी जिंकू शकली नाही, त्यामुळे आम्ही सर्वजण नाराज झालो. नंतर शिक्षकांनी ही स्पर्धा खेळण्यास सुरवात केली. त्यावेळीही प्रथम प्रथम निराशाच पदरी पडली; परंतु नंतर पोतदारबाईंनी व सालपेकरबाईंनी ही स्पर्धा जिंकली, तेव्हा शिक्षकांना आनंद झालाच, शिवाय मुलींनाही इतका आनंद झाला की, जणू शिक्षकांनी मिळविलेले यश हे आपल्याचपैकी कोणीतरी मिळविलेले हे यश आहे, ही भावना प्रत्येकीच्या मनात येऊन सर्वजणी एकाच आनंदात सामील झालो.

माझा ज्या ज्या शिक्षकांशी संबंध आला ते बहुतेक सर्वच शिक्षक प्रेमळ होते असा माझा अनुभव आहे. काही वेळा कित्येक शिक्षक रागावलेही होते, पण ते आमच्या हिताचेच होते, हे आता समजून येते.

शाळेतील आठवणी इतक्या येतात, की त्या शब्दांत गुंफता गुंफता संपणारच नाहीत.

# काही आठवणी

—द्वारका दिवेकर

कै. सौ. इंदिरा भालचंद्र गोखले ( द्वारका दिवेकर ) शाळेच्या माजी विद्यार्थिनी सन १९२४–३०, सोफिया कॉलेज होम सायन्स सर्टिफिकेट, अध्यक्ष व ट्रस्टी–आर्य महिला समाज, हिंद महिला समाज, सेवासदन, वुइमेन्स वर्कगिल्ड, अखिल भारतीय महिला परिषद, महाराष्ट्र स्टेट वुइमेन्स कौन्सिल या संस्थांच्या तहाह्यात सभासद.

मुंबईमध्ये फेब्रुवारी १९२४ साली नवरोजी स्ट्रीट येथे कन्याशाळेची स्थापना झाली. त्यावेळी मी ठाकुरद्वार येथील म्युनिसिपल शाळेत इयत्ता ५ वीत शिकत होते.

कन्याशाळेत मुली मिळविण्याकरिता श्री. पार्वतीबाई आठवले त्या भागात घरोघरी जाऊन मुलींना पाठविण्याबद्दल पालकांना विनंती करीत. त्याप्रमाणे एक दिवस श्री. पार्वतीबाई आमच्या घरी आल्या व शाळेबद्दल सर्व माहिती सांगून आपल्या मुलीस आमच्या शाळेत पाठविण्याबद्दल त्यांनी माझ्या वडिलांना विनंती केली. त्यांच्या विनंतीनुसार जून १९२४ मध्ये मी कन्याशाळेत दाखल झाले. त्यावेळी शाळेचे मुख्याध्यापक माझ्या मैत्रिणीचे वडील श्री. लक्ष्मण बाळकृष्ण नायक हे होते. त्यांनी आपली मुलगी या शाळेत घातली व जवळपासच्या इतर मुली पण त्यांच्यामुळे शाळेत आल्या. शाळेला चांगली मुख्याध्यापिका मिळेपर्यंत त्यांनी शाळेचे काम विनामूल्य करण्याचे मान्य केले होते व जानेवारी १९२५ मध्ये श्री. सीताबाई अण्णिगेरी येईपर्यंत त्यांनी ती जबाबदारी उत्तम तऱ्हेने पार पाडली.

शाळेत सुरवातीला प्रार्थना झाल्यावर गीतेचे श्लोक ते म्हणून घेत. गीतेची गोडी त्यांनीच आम्हाला लावली. सुरवातीला शाळेत तीन इयत्ता होत्या. दरवर्षी एक याप्रमाणे इयत्ता वाढून १९३० साली शाळेचे संपूर्ण हायस्कूलमध्ये रूपांतर झाले.

श्री. सीताबाई मुख्याध्यापिका म्हणून आल्या त्यावेळी शाळेत २५–३० मुली होत्या, त्यामुळे त्यांचा व आमचा प्रत्यक्ष खूप संबंध येत असे. शेजारीच कमळाबाईची शाळा असल्यामुळे शाळेची फारशी प्रगती होत नव्हती. या शाळेत सर्व शिक्षण मराठीतूनच असल्यामुळे लोक शाळेकडे जरा तुच्छतेनेच पाहात. हे पण शाळेची फारशी प्रगती न होण्याचे एक कारण म्हणता येईल.

शाळा येथून हलवून दुसरीकडे जेथे मुलींची शाळा नाही अशा ठिकाणी नेल्याशिवाय शाळेची लवकर प्रगती होणार नाही, असे वाटल्यावरून लवकरच खेतवाडीत ( सध्या जेथे युनियन हायस्कूल आहे ) शाळा हलविण्यात आली. इतक्या लांब मुली कशा पाठवाव्या हा प्रश्न आमच्या पालकांच्या समोर उभा राहिला. परंतु कु. विमल नायक हिच्या वडिलांनी त्यांची गाडी शाळेत नेण्या–आणण्याला देण्याचे मान्य केले व गाडीतून आम्ही पाचजणी—मी, कु. विमल नायक, कु. अंबिका धुरंधर, कु. सरला राणे व कु. हिरू तळपदे–शाळेत जाऊ लागलो. तेथे गेल्यावर शाळेची बरीच भरभराट झाली. परंतु आजूबाजूची वस्ती चांगली नसल्यामुळे १९३० मध्ये ही जागा सोडून कन्याशाळा गिरगाव बॅकरोड येथे ( हल्लीचे आनंदभुवन आहे त्या जागी ) आली व तेथे मात्र शाळेची चांगली प्रगती झाली. आमची प्रवेशपरीक्षा त्याच जागेत झाली. १९३० पर्यंत फक्त पुण्याला प्रवेश परीक्षा होत असे. १९३० साली मुंबईला सेंटर मिळाला व आम्ही ४–५ मुली एप्रिलमध्ये प्रवेश परीक्षेला बसलो. त्यावेळी मुंबईला कॉलेज नसल्यामुळे मी पुढील शिक्षण घेऊ शकले नाही. कर्वे विद्यापीठाची प्रवेशपरीक्षा निराळी असल्यामुळे मुंबई विद्यापीठाच्या कॉलेजमध्ये आम्हाला प्रवेश मिळत नसे.

श्री. सीताबाई शिस्तीच्या भोक्त्या व स्वभावाच्या कडक पण तितक्याच प्रेमळ आहेत. त्या आमच्याशी फारच प्रेमळपणाने व आपुलकीने वागत. आम्हाला त्यांची कधीही भीती वाटली नाही. मुलींच्या प्रत्येक गोष्टीकडे त्यांचे अत्यंत बारीक लक्ष असे.

१९२८ साली मी इयत्ता ५ वी पास झाले व मे महिन्यात माझे लग्न झाले. सासरची मंडळी शिक्षणप्रेमी असल्यामुळे माझे शिक्षण पुढे चालू ठेवावयाचे ठरले व जूनमध्ये शाळा उघडल्यावर मी शाळेत गेले. मला शाळेत पाहून आमच्या एका शिक्षकाला आश्चर्य वाटले. कारण ४५ वर्षांपूर्वी लग्नानंतर शिक्षण घेण्याचा फारसा प्रघात नव्हता. आता मुलांच्याबरोबर मॅट्रिक किंवा बी.ए.ला बसणाऱ्या भगिनी आपण पाहातो.

आमच्या वेळी शाळेत पहिली ते तिसरी आठ आणे व चौथी ते सातवी १ रुपया अशी फी होती. आता ही गोष्ट इतिहासजमा झाली आहे.

वार्षिक गॅदरिंगमध्ये श्री. सीताबाई आम्हां मुलींमध्ये अत्यंत खेळीमेळीने भाग घेत. गृहविज्ञान हा विषय त्या स्वतः आम्हांला शिकवीत.

शाळेची भरभराट झाली तेव्हा शाळेने 'ज्ञानलता' हस्तलिखित मासिक सुरू केले. मुलींना सभाधीटपणा यावा म्हणून 'वक्तृत्व–वर्धिनी' सभा सुरू केली. अशा तऱ्हेने शाळेची निरनिराळ्या तऱ्हेने भरभराट होत गेली.



कै. सौ. इंदिराबाई गोखले

शाळेचा रौप्यमहोत्सव अत्यंत थाटाने व उत्साहाने साजरा झाला. ५० वर्षांचा सुवर्णमहोत्सव पण थाटामाटात साजरा होईल. कारण आज शाळेला स्वतःची इमारत आहे. हजाराच्यावर मुली शाळेत आहेत. शाळेच्या उत्साही मुख्याध्यापिका सौ. प्रतिभा भवाळकर व शिक्षकवर्गही उत्साहाने काम करीत आहे. शाळेचा ६० वर्षांचा हीरक महोत्सव साजरा करण्याची संधी आम्हांला मिळो, अशी त्या परमेश्वराजवळ प्रार्थना करून मी माझे निवेदन पूर्ण करते.

# सौ. विजया खाडिलकर

पी. ए., बी. टी.

माझ्या आयुष्याची जवळजवळ ४० वर्षे ह्या शाळेत गेली. प्राथमिक शाळेचा अभ्यास पुरा झाला आणि मी विद्यार्थिनी म्हणून प्रवेश केला. मध्यंतरीची उच्च-शिक्षणाची सहा व प्रशिक्षणाचे (S. T. C.) एक अशी सात वर्षे गेल्यानंतर शिक्षिकेच्या भूमिकेत मी पुन्हा प्रवेश केला. माझ्या आयुष्याची जडणघडण इथेच झाली. बाल्य, तारुण्य व वार्धक्याची काही वर्षे इथेच गेली.

तो दिवस मला प्रामुख्याने आठवतो. मी पश्चिम खेतवाडीच्या म्यु. शाळेत चौथ्या इयत्तेत शिकत होते. प्राथमिक शालान्त परीक्षा त्यावेळी सरकारी शिक्षण-खात्याकडून होत असे. परीक्षा झाली होती. परीक्षेचा निकाल लागावयाचा होता. आम्ही मुली शाळेत उगीचच खेळण्यासाठी जात असूं. एके दिवशी मध्यम वयाच्या, करारी मुद्रेच्या एक बाई आमच्या वर्गांत आल्या. त्यांनी आमच्या मुख्याध्यापिका श्रीमती सुलोचनाबाई शासने यांची भेट घेतली व आम्हां मुलींची चौकशी केली, 'तुम्ही कोणत्या शाळेत जाणार ?' मी त्यांना सांगितले 'मी कर्व्यांच्या शाळेत जाणार...' त्यावेळी खरे म्हणजे कर्व्यांच्या शाळेत जाणे ही गोष्ट लोकांच्या दृष्टीने हास्यास्पद होती. पण माझे वडील राष्ट्रीय वृत्तीचे असल्यामुळे माझी एक आत्या त्यांनी हिंगण्याला शिकण्यासाठी ठेवली होती. व मलाही मुंबईच्या शाळेत पाठविण्याचा त्यांचा विचार होता. वर सांगितलेल्या बाई म्हणजे श्रीमती सीताबाई आण्णिगेरी होत. त्या दिवशीं बाई आमच्या घरी आल्या. त्यांनी माझ्या वडिलांची भेट घेऊन 'आमच्या शाळेतच तुमच्या मुलीला पाठवा' असे आवर्जून सांगितले व त्या दुसऱ्या माझ्यासारख्याच मुलींच्या घरोघरी गेल्या. त्यांनी असेच घरोघरी जाऊन कित्येक वर्षेपर्यंत मधमाशीच्या वृत्तीने मुली गोळा करून शाळेचें संवर्धन केलें.

त्यावेळी नाथीबाई कन्याशाळेतील शिक्षणाला गावठी शिक्षण म्हणत. मला या शाळेत घातल्यानंतर काही जवळपासच्या लोकांनी तशी चेष्टाही केली. मुंबईत इतक्या शाळा असताना ह्या गावठी शाळेत मुलीला कशाला घातली असे काहीजण म्हणत. पण लोकांच्या या टीकेकडे दुर्लक्ष करून आम्ही आमची वाटचाल चालू ठेवली.

शाळेतील दिवस उत्साहाने जात होते. शिकावे, घरी अभ्यास करावा; शाळेत खेळायला खूप जागा होती. ४॥ वाजता शाळा सुटे. त्यानंतर दमेपर्यंत खेळावे आणि ५॥ वाजता घरी जावे. थोडा वेळ विश्रांती घेऊन घरकामात आईला मदत करावी. रात्री अभ्यास करावा आणि झोपी जावे असा दिनक्रम सात वर्षे चालला.

मी ५ वींत असतानाच शाळेत ज्ञानलता हस्तलिखित त्रैमासिक चालू झाले. प. वा. श्री. सौ. इंदिराबाई गोखले, (त्यावेळच्या द्वारका दिवेकर), कु. बनूताई हळदणकर, श्रीमती बयोताई आयाचित, कु. विमल नायक, कु. अंबिका धुरंधर वगैरे मुली उत्साहाने मासिक चालवीत असत. त्यांना कु. मथुताई केतकर व कु. इंदिराबाई उरणकर या आमच्या आवडत्या शिक्षिका मार्गदर्शन करीत. मुलींना सभाधीटपणा यावा या हेतूने वक्तृत्ववर्धिनी सभेची स्थापनाही त्याच काळांत झाली. मुलींची संख्या वाढल्यानंतर या सभेच्या दोन शाखा झाल्या. एक ५ वी ते ७ वी व दुसरी ८ वी ते ११ वी. त्या सभेच्या सेक्रेटरींच्या निवडणुका होत. दर वर्षी नवीन नवीन मुलींना ही संधी मिळे. त्यांना अशा संस्था चालविण्याचे शिक्षण याच वयांत मिळे. एका वर्षी छोट्या (५ वी ते ७ वी) सभेची सेक्रेटरी म्हणून मी निवडून आले होते. त्यावेळी मला केवढी धन्यता वाटली. घरी जाऊन वडिलांना ही गोष्ट केव्हां सांगते असे मला झाले होते. दर मंगळवारी या सभेतर्फे कार्यक्रम होत. एका मंगळवारी ५ वी ते ७ वी या इयत्तांचे कार्यक्रम व दुसऱ्या मंगळवारी ८ वी ते ११ वी या इयत्तांचे कार्यक्रम होत. वरच्या वर्गांतील मुली एखाद्या विषयावर वादविवाद करीत. आमचे शिक्षकही या वादविवादांत जातीने भाग घेत. वादविवादांत प्रतिपक्षाचे मुद्दे कसे खोडून काढावे यांचे जणू ते मार्गदर्शनच विद्यार्थिनींना करीत. शिक्षकांपैकी कोणीतरी अध्यक्षस्थानी असत. ते शेवटी समारोप करीत. सभा संपायला एखादेवेळीं ६॥ वाजून जात. आम्ही ५ वी ७ वी च्या मुलीही वादविवादांत रंगून जात असूं. ५ वी ते ७ वी च्या विद्यार्थिनींना गाणी म्हणणे, गोष्टी सांगणे, नाट्यप्रवेश करणे, चांगल्या लेखकांच्या इंग्रजी व मराठी कविता म्हणणे वगैरे कार्यक्रम करावयाचे असत. त्यांतही मुली हिरीरीने भाग घेत असत.

त्यावेळचे आमच्या शाळेचे एक वैशिष्ट्य म्हणजे कलाविषयांना असलेले महत्त्व. श्रीमती सीताबाई अण्णिगेरी यांना या विषयांत फारच आत्मीयता होती व शाळेला अभ्यासक्रम व वेळापत्रक यांबाबत स्वायत्तता होती. कु. उरणकरबाईंच्या नेतृत्वाखाली शिवणाचे, भरतकामाचे, विणकामाचे निरनिराळे नमुने तयार करीत. तसेच दरवर्षी संक्रांतीला मुली हलवा करीत त्यांना बक्षिसं देण्यांत येई.

आमच्या शाळेत संगीतालाही खूप महत्त्व होते. महाराष्ट्र संगीत विद्यालयाचे प्रिन्सिपॉल गुरुवर्य ग. रा. गोखले हे त्यावेळी संगीत शिक्षक होते. त्यांच्या संगीत विद्यालयाची स्थापना याच शाळेत झाली. जागा व पहिल्या विद्यार्थिनी शाळेच्याच होत्या. त्यामुळे दर महिन्याला संगीतसभेचा कार्यक्रम आमच्या शाळेच्या सभागृहांत होत असे. व आम्हांला सीनियर मुलींचे संगीताचे कार्यक्रम ऐकावयास मिळत असत. माझी गाण्याची आवड तेव्हांपासूनच वाढीस लागली व संगीत विषय घेऊन पी. ए. (प्रदेयागमा) होण्याची माझ्या शैक्षणिक जीवनाची बीजें इथेच पेरली गेली.

आमच्या शाळेचे स्नेहसंमेलन दर दोन वर्षांनी होई. त्यांतील सर्व कार्यक्रम मुली व शिक्षकच बसवीत. मी १० वींत असताना शाळेत पन्नादाई नाटिका संम्मेलनासाठी बसविली होती. तिचे लेखन सुद्धा कै. श्री. अमलादी गुरुजी यांनी केलें होतें. व काही प्रवेश शाळेतील विद्यार्थिनींनी लिहिले होते. कावसजी जहांगीर हॉलमध्ये ही नाटिका यशस्वी रीत्या पार पडली. हें सांगतांना कै. श्री. अमलादी गुरुजींचे सादर स्मरण होतें. भाषाविषय शिकविताना गुरुजी इतके रंगून जात की त्यांना वेळेचे भान राहात नसे. ते शिकवीत असता त्या त्या वातावरणांत आम्हाला सोडीत. तास संपला की घंटा देणाऱ्या बाळूचा मनस्वी राग येई.

आम्ही ११ वीत गेलो आणि गुरुवर्य अमलादी (डॉ. वीणेकर) शाळा सोडून गेले. कैवल्यधामात ते काम करूं लागले. त्यानंतर कै. वा. दा. गोखले मराठी शिकवूं लागले. पण त्याच वर्षी एस. एन. डी. टी. कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून त्यांची नियुक्ति झाल्यामुळे आम्ही त्यांच्या शिकवण्याला पारख्या झालो. तेव्हा संगमनेरच्या शाळेतून सेवा-निवृत्त झालेले कै. गुरुवर्य लेले (सौ. टिकेकरबाईंचे वडील) आम्हांला संस्कृत व इंग्रजी शिकवूं लागले. वयाने व अनुभवाने आलेला शांतपणा हाही शिक्षकी-पेशा किती आवश्यक याचा अनुभव त्यावेळी आला. निबंधातील वाक्यन् वाक्य तपासून त्यांतील शुद्ध-लेखनाच्या व विचार–मांडण्यांतील चुका प्रत्येक मुलीच्या निदर्शनास आणून देत (अर्थात् त्यावेळी वर्गांत मुली २२ च होत्या). संमेलनांतील संस्कृत नाट्यप्रवेशांत आधुनिक चालींवर संस्कृत पद्यें करून आम्हांला शिकवीत असत. सर्व शिक्षकांत कु. कावेरीबाई जोशी या तर आम्हां मुलींच्या लाडक्या शिक्षिका. पण त्यांचा सहवास आम्हांला फक्त ९ वीपर्यंतच लाभला. नंतर त्यांचा विवाह श्री. भास्करराव कर्वे यांच्याशी झाला आणि त्या हिंगण्याला गेल्या. कावेरीबाई म्हणजे उत्साह-मूर्ती. कु. मथुताई केतकर परदेशी गेल्या व कावेरीबाई शाळेत आल्या. वक्तृत्ववर्धिनी सभा, ज्ञानलता मासिक, गर्लगाईड, दुपारच्या छोट्यामोठ्या सुटींत मुलींच्याकडून नमस्कार घालून घेणे, गॅदरिंग, कांही कार्यक्रमांसाठीं मुलींना बाहेर घेऊन जाणे या सर्व गोष्टींत त्यांचा पुढाकार असे. त्यामुळे त्यांचा सहावास शाळेत असताना अधिकच घडला. एकदा मी शाळेचा जिना चढत होते आणि प्रत्येक पायरीवर पाय आपटत आवाज करीत आपल्याच तालांत मी चालले होते. माझ्या मागून कावेरीबाई अगदी हलक्या पावलांनी जिना चढून आल्या व माझ्याकडे पाहून नुसत्या हसल्या. मी बाजूला होऊन त्यांना वाट दिली आणि त्यांच्या हसण्याचा आशय माझ्या लक्षांत आला. जिना कसा चढावा याचे शिक्षण मला त्यावेळी मिळाले. अजूनही शाळेचा जिना चढताना मला नेहमी या प्रसंगाची आठवण येते.

आणखी काही चांगल्या प्रथा आमच्या शाळेत होत्या. रोजची प्रार्थना सर्व वर्गांची एकत्र होई. नंतर सर्व मुली आपापल्या वर्गांत जात. पहिली १० मिनिटें गीतापठण चाले. दररोज भगवद्गीतेचा एक श्लोक अर्थासह पाठ करून घेतला जाई. त्या भाषेला शुद्ध उच्चारांची जोड आपोआपच मिळे. सुशिक्षित व्यक्तीला उच्चारांचे

स्पष्टत्व आवश्यक असते. हल्ली 'बहुजनसमाजाला संस्कृत उच्चार करतां येत नाहीत म्हणून संस्कृतच काढून टाका' अशी विचारसरणी प्रचलित झाली आहे. सरकारी अभ्यासक्रमांत दिलेले असते कीं संस्कृत शिकविणाऱ्या शिक्षकाने मुलांच्या उच्चाराकडे लक्ष द्यावे. त्यापेक्षा वरील रोजच्या पाठान्तराने हे काम सहज साध्य होईल.

श्रीमती सीताबाई अण्णिगेरी अमेरिकेला गेल्या त्या काळांत श्रीमती वारूबाई शेवडे यांची लेडी सुपरिंटेंडेंट म्हणून नियुक्ती झाली होती. त्यावेळी आनंदभुवनमध्ये (आंग्रेवाडीच्या समोर आतां जी खूप मोठी इमारत आहे त्या जागीं तीन मजली आजूबाजूला कंपाऊंड असलेली इमारत होती) शाळा होती. त्यावेळी सर्व वर्गांची एकत्र प्रार्थना दर शनिवारी होई. त्यावेळी सर्व शिक्षक पाळपाळीने नीतिपाठ घेत. कोणत्याही धर्मातील संतांच्या वचनावर विवेचन, इतर धर्मीयांच्या धर्मग्रंथांतील उतारे यांची ओळख मुलींना करून दिली जात असे. सर्वधर्मसहिष्णुतेच्या दृष्टीने या गोष्टी पोषक आहेत असे मला वाटते.

मी शिक्षिका म्हणून शाळेत आल्यानंतर प्रथम संगीताचे सर्व काम माझ्याकडे असे. नंतर एक दोन वर्षातच माझ्या जोडीला सौ. शालिनी दुमले संगीत शिकवूं लागल्या. शाळेत ॲम्प्लिफायर बसवल्यानंतर सर्व वर्गांतून वेगळी प्रार्थना न होता आफिसमधूनच प्रार्थना क्षेपित केली जात असे. त्यावेळी सरस्वतीची भूपाळी, महाराष्ट्र गीत, यांसारख्या कविता निवडून, चांगल्या चाली लावून, प्रत्येक गीतासाठी मुलींचा समूह ठरवून प्रत्येक वारासाठीं एकेक कविता प्रार्थनेसाठी आम्ही घेतली होती. अनायासेच चांगल्या कविता मुलींच्या पाठ होत असत. पुढे एस. एस. सी. बोर्डाच्या परीक्षेस मुली बसूं लागल्या. अभ्यासक्रमांत बदल झाला. मुलींची संख्या बरीच वाढली. दुवक्त शाळा झाली. रात्र थोडी आणि सोंगे फार अशी अवस्था झाल्यावर ह्या काही प्रथा हळूहळू काळाच्या पडद्याआड गेल्या. दुवक्त शाळा झाली त्यावर्षी आम्हीं बसवलेल्या समूहगीताला ऑल इंडिया रेडियो या स्पर्धेत १ ले बक्षीस मिळाले.

शाळेचा २५ वर्षांचा वाढदिवस माझ्या सेवाकाळांतच झाला. ५० वा वाढदिवसही माझ्या सेवाकाळांतच होत आहे हें माझें भाग्य आहे. २५ व्या वाढदिवसाच्या वेळी कार्यक्रमांत माझा भाग बराच होता. आतां वयपरत्वें शारीरिक दौर्बल्यामुळे मी भाग घेऊं शकत नाही. पण माझ्याच विद्यार्थिनी आतां शिक्षिका होऊन ह्यांत भाग घेऊन कार्यक्रमाची तयारी करीत आहेत हें पाहून मन तृप्त होतें.

संख्येच्या दृष्टीने शाळेची खूप प्रगती झाली आहे. शिक्षणाच्या प्रसाराबरोबर खोली कमी झाली आहे. बहुजनसमाजाला शिक्षित करण्याचे धोरण असल्यामुळे मागस वर्गातील (B. C.) मुलींचा भरणा अधिक असतो तरी शालान्त परीक्षेचा निकाल चांगला असतो.

सध्यां शाळेच्या मुख्य अध्यापिकेच्या पदावर श्री. सौ. प्रतिभाबाई भवाळकर आहेत. शाळेची आर्थिक बाजू भक्कम करण्याचे प्रयत्न सतत चालू असतात. त्याचे दृश्य स्वरूप म्हणजे शाळेतील उत्तम फर्निचर, ग्रंथालय, संगीतवर्गाची व्यवस्था, नुकतीच चालू असलेली प्रयोगशाळेची उभारणी. आजच्या जगांत अन्तर्गत विकास हा आर्थिक आधारावरच असतो. सामान्य जीवनांत द्रव्य व बचत याला महत्त्व आहे. त्याचे शिक्षण शालेय जीवनांतच मिळावे याद्दष्टीने अल्पबचत योजनेचा उपक्रम शाळेत त्यांनी सुरू केला. तसेंच अगदी अलीकडेच गेल्या डिसेंबरमध्यें एका संचयिकेची स्थापनाही झाली आहे. शाळेची अशीच उत्तरोत्तर प्रगती होवो अशी मनापासून इच्छा आहे.

आता शेवटी आमचे दिवंगत गुरुजी कै. श्री म. पां. वैद्य यांचे कृतज्ञापूर्वक स्मरण केल्याशिवाय राहवत नाही. माझा गुरुजींशी विशेष संबंध आला तो मी बी. टी ला बसले त्यावेळीं. प्रोजेक्ट करण्याच्या कामांत त्यांनी घरी येऊन मला मार्गदर्शन केले. दर वर्षी ११ वीच्या निरोपसमारंभाचे वेळी तर त्यांची स्मृती प्रामुख्याने होते. असा एकही निरोपसमारंभ झाला नाही की वैद्यगुरुजींचे भाषण झाले नाहीं. आपल्या विनोदी पण कळकळीच्या भाषेत मुलींना ते उपदेश करीत. तसेच परीक्षेच्या वेळी जवळपासच्या परीक्षाकेंद्रावर जाऊन मुलींना शुभेच्छा देऊन येत. १९३० सालापासून १९६३ सालापर्यंत शाळेची सेवा करून सेवेंत असतानाच त्यांनी इहलोकींची यात्रा संपविली. त्यांच्यापूर्वी कित्येक वर्षे दिवंगत झालेले कै. श्री. वीरकरगुरुजी व अलिकडेच परलोकवासी झालेले कै. श्री. केळकरगुरुजी यांना श्रद्धांजली वाहून मी माझा लेख संपविते.

# शालेय आठवणी

**श्री. अंबिका महादेव धुरंधर** (माजी विद्यार्थिनी)
सर जे. जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये कलाशिक्षण. गव्हर्नमेंट डिप्लोमा इन पेन्टिंग पदवीधर. प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण. व्यावसायिक चित्रकार आणि कलाशिक्षिका. संचालिका 'धुरंधर कला मंदिर.'

१९२४ साली कन्याशाळेची स्थापना झाली. नौरोजी स्ट्रीट या छोट्याशा गल्लीत एका नवीन इमारतीत तिसऱ्या मजल्यावरील पहिल्या तीन वर्गांनी शाळा सुरू करण्यात आली. इंग्रजी पहिलीत सात–आठ मुली, दुसरीत चार मुली आणि तिसरीत फक्त दोन मुली. १ लीतील राणे, त्रिलोकेकर, तळपदे यांची आठवण पक्की आहे. २ रीत मी स्वतः, द्वारका दिवेकर (नुकत्याच दिवंगत झालेल्या इंदिरा गोखले) व सुंदर पितळे (देशसेविका श्रीमती सुंदर पौडवाल) आणि ३ रीत विमल नायक (सौ. विमल वेलकर) व सुमती हेगडे या सर्व सहाध्यायी मैत्रिणींची मैत्री आजपर्यंत कायम आहे.

तिसऱ्या मजल्यावरील इमारतीत फक्त चार खोल्या. लहानशाच! एक कचेरीसाठी. दुसऱ्या दोनमध्ये १ ली व २ री चा वर्ग आणि चौथा मोठा ऐसपैस दिवाणखाना. त्यात एका कोपऱ्यात दोन बाकं ३ रीच्या वर्गासाठी. इतर जागा खेळण्यासाठी व सकाळच्या प्रार्थनेसाठी वापरण्यात येई. माझे मामा कै. लक्ष्मण बळवंत नायक यांनी शाळेचो धुरा वाहिली होती. सर्व जबाबदारी पेलून त्यांनी आपली सेवा विनामूल्य दिली. संस्कृत आणि इंग्रजी भाषेवर त्यांचे विलक्षण प्रभुत्व होते आणि हे विषय शिकविण्यातही त्यांचे मोठे कौशल्य दिसून येई.

शाळेचा शिक्षकवर्गही छोटासाच होता. स्वतः नायक सर्वच वर्गांवर आळीपाळीने शिकवीत असत. सौ. मालतीबाई कर्वे, श्री. आचवलबाई, श्री. काशीताई नाटेकर, श्री. पटवर्धन व गोखलेमास्तर, ड्रॉईंगमास्तर फडके आणि गायनमास्तर गोखले. हा सारा शिक्षकवर्ग अत्यंत मेहनती आणि जिवाभावाने शिकविणारा होता.

१९२५ साली श्री. सीताबाई अण्णिगेरी या शाळेच्या मुख्याध्यापिका म्हणून आल्या आणि त्याच वर्षी नौरोजी-स्ट्रीटमध्ये, कमळाबाईंची शाळा, म्हणजे एस. एल. ॲण्ड एस. एज्युकेशन सोसायटीच्या शाळेच्या नवीन इमारतीचे काम सुरू झाले. प्रथम ही शाळा भाई जीवनजी गल्लीमध्ये होती. अर्थातच याचा परिणाम आमच्या नुकत्याच सुरू झालेल्या शाळेवर होणे सहाजिकच असल्याने आमची शाळा, खेतवाडी मेनरोडवरील एका इमारतीत हलविण्यात आली. खेतवाडीत शाळा आल्यावर मुलींची संख्या वाढली, वर्ग वाढले, शिक्षकवर्गही वाढला. बोधेबाई, केतकरबाई, उरणकरबाई इ. नवीन शिक्षिकांचा लाभ झाला. शाळेचा इतर व्यापही वाढला. त्यात वक्तृत्व सभा आली. सहली, सहभोजन, संमेलन इत्यादींची भर पडली. नृत्य, नाट्य, गायन–वादन अशा विविध गोष्टी आल्या. या

इमारतीतही तिसऱ्या मजल्यावर शाळा असूनही त्या बंदिस्त खोल्यांतून आमचे खेळ चालायचे. त्यात खो–खो, फुटबॉलसारखा पळापळीचाही खेळ होई.

शाळेचे रौप्यमहोत्सवी वर्ष सध्याच्या इमारतीतच साजरे झाले. त्याकरिता मांडण्यात आलेल्या कला-प्रदर्शनास मी छोटासा हातभार लावला आणि माझ्या कुंचल्याने रेखाटलेली कै. महर्षी कर्वे यांची तैलरंगी प्रतिमा त्यांच्या ९० व्या वाढदिवशी अर्पण केली आहे. याबद्दल मला धन्यता वाटत आहे.

श्री. सीताबाई अण्णिगेरी यांनी लाविलेल्या शिस्तीचा आणि केलेल्या मार्गदर्शनाचा लाभ मला आयुष्यभर पुरणारा आहे.

१९२७ साली मी शाळा सोडली आणि सर जे. जे. आर्ट स्कूलमध्ये प्रवेश केला. कारण त्यावेळी मी खार येथें राहण्यासाठी आल्याकारणाने शाळा सोडावी लागली.

एस. एन. डी. टी. कन्याशाळा म्हणण्यापेक्षा आम्हीं कर्व्यांच्या शाळेच्या मुली म्हणवून घेण्यात अधिक अभिमान वाटतो. आज सुवर्णमहोत्सव साजरा करीत असलेल्या शाळेचा पाया १९२४ साली घातला गेला त्यावेळी जे दगड बसविण्यात आले त्यांपैकीच मी एक आहे, ही अत्यंत सुखदायक भावना माझ्या मनात सदैव जागत आहे.



श्री. अंबिका महादेव धुरंधर

# काही नामवंत माजी विद्यार्थिनी

**सौ. विजया रानडे** (तारा चितळे) जी. ए.

ऑनररी सोशल वर्कर, सिटी सिव्हिल कोर्टात लेडी ज्यूरर म्हणून काम केले. १९५२ साली दादर भगिनी समाजाच्या अध्यक्ष व १९५६ ते ६६ संस्थेच्या विश्वस्त. १९५६ मध्ये 'अखिल भारतीय महिला परिषद, दादर-माटुंगा शाखा' या संस्थेच्या अध्यक्ष व १९५८ ते ६८ पर्यंत विश्वस्त म्हणून काम केले. दादर भगिनी समाजात क्रीडाविभाग, आरोग्यकेंद्र व कुटुंबनियोजन–केंद्र यांच्या संचालिका म्हणून काम केले.



सौ. विजया रानडे

**सौ. कुसुम किरकिरे** (कुसुम सोहोनी)

१९३०, ३२ व ४२ या वर्षी झालेल्या स्वातंत्र्य-संग्रामात काम केले. १९६० पासून बारा वर्षे जे. पी. म्हणून काम केले. 'सुयोग साधना' या पुण्याच्या विवाहमंडळाची शाखा दादरमध्ये चालवितात.

**सौ. विजया खाडिलकर** (सुमती परमेकर) पी. ए., बी. टी. शिक्षिका, श्री. ना. दा. ठा. कन्याशाळा, मुंबई.

**सौ. लीला जोशी** (इंदू मराठे) एम. ए. डिप.–लायब्रेरियन. पी. व्ही. डी. टी. कॉलेजमध्ये लायब्रेरियन म्हणून काम करतात.

**कु. अलका राव** केंद्रिय सचिवालय हिन्दी परि-षदेच्या 'अखिल भारतीय हिन्दी टाइपिंग प्रतियोगिता' या परिक्षेत मुंबई केंद्रात पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण. 'अर्थ व सांख्यिकी केंद्र' या ऑफिसमध्ये लिपिक टंकलेखनच्या जागेवर काम करतात.

**कु. मालती पोतदार**, एम. ए., एम. एड.

शिक्षिका, श्री. ना. दा. ठा. कन्याशाळा मुंबई.

श्री. ना. दा. ठा. महिला विद्यापीठाच्या एन्ट्रन्स परीक्षेत विद्यापीठात प्रथम वर्गात प्रथम क्रमांक. एम. ए. परीक्षेत विद्यापीठात प्रथम क्रमांक.

**सौ. मालती मनोहर** (काशी वेलणकर) एम. ए., बी. टी.

उपमुख्याध्यापिका, ट्रेनिंग कॉलेज, शिशुविहार, दादर.

**कु. भानुमति ढोलेकर** (गडकरी पारितोषिक)

एम. ए , बी. टी. ॲसि. हेडमिस्ट्रेस, आर्यन एज्यु-केशन सोसायटीची मुलींची शाळा, शारदा सदन, मुंबई.

**डॉ. सुहासिनी मुसळे** एम. बी., बी. एस.

**प्रा. सुनंदा कर्नाड**, प्राध्यापक, एलफिन्स्टन कॉलेज, मुंबई.

**डॉ. सौ. प्रतिमा काळे,** ( कुसुम दिवेकर )

१९६१ एम. ए. (एस. एन. डी. टी. विद्यापीठ, मुंबई. )



डॉ. सौ. **प्रतिमा काळे**

१९६७ एम. एस. (व्हिसकॉनसिन युनि. यू. एस. ए.)
१९७० पी. एच. डी. ( मिनिसोटा युनि. यू. एस. ए. )
१९७०–७१ लेक्चरर, ( मिनिसोटा युनि. यू. एस. ए. )
१९७१ पासून डायरेक्टर ऑफ एज्युकेशन, फोर्ड फौंडेशन, न्यू दिल्ली. येथे काम करीत आहेत.

**डॉ. सौ. गार्गी सरदेसाई** ( भाटवडेकर )
राज्य पुरस्कार विजेत्या १९७४

१९३८ पी. ए, १९६५ पी. एच. डी., जी. ए परीक्षेत विद्यापीठात प्रथम क्रमांकाबद्दल सुवर्णपदक व संस्कृत व इंग्रजी या विषयांत प्रथम क्रमांकाची पारितोषिके मिळाली. त्यांनी अनेक ग्रंथ लिहिले आहेत. १९३५ मध्ये कोपनहेगन येथे भरलेल्या परिषदेसाठी प्रतिनिधी म्हणून गेल्या होत्या. युरोप व रशिया या देशांना त्यांनी भेट दिली आहे. अनेक संस्थांतून त्यांनी व्याख्याने दिली आहेत व अनेक नियतकालिकांत त्यांचे लेख प्रसिद्ध झाले आहेत. महिला विद्यापीठाच्या सिनेटच्या १९७१ पर्यंत त्या सभासद होत्या. सध्या त्या एस. एन. डी. टी. कॉलेज, मुंबई येथे मराठीच्या रीडर म्हणून काम करीत आहेत.



डॉ. सौ **गार्गी सरदेसाई**

**श्रीमती विजया जोगळेकर, एम. ए.**

अभिनयाची, वक्तृत्त्वाची व संगीताची आवड आहे. श्री. ना. दा. ठा. महिला विद्यापीठातून संगीतविषय घेऊन एम. ए. झाल्या. त्या आकाशवाणी कलावंत असून चित्रवाणीकेंद्रावर Production Asstt. या पदावर आहेत.



श्रीमती **विजया जोगळेकर**

**सौ. नलिनी पारकर** ( आचार्य ) एम. ए., एम. एड., दादर विद्यामंदिर.

**सौ. सरला पंडित** ( वर्दे ) जी. ए. ( प्रवेश परीक्षेत १ ला क्रमांक ) 'अवर सचिव', वित्तविभाग सचिवालय, मुंबई.

**डॉ. सुनंदा वागळे**

**श्री. भारती आर्ते** B. Arch. सध्या स्थापत्य आर्किटेक्टस् येथे नोकरी करीत आहे.

**डॉ. हिरा शिंकें**

**सौ. कमल जोगळेकर** ( वेणू गोखले ) साहित्यविशारद

**डॉ. उषा माहीमकर**

**निर्मला परांजपे** ( सरोजिनी दाबके ) एम. ए.

**कुसुम वैद्य** ( कुळकर्णी ) एम. ए.

**सौ. इंदू कर्वे** ( इंदू वीरकर ) जी. ए., बी. टी. गडकरी पारितोषिक.

**पद्मश्री श्रीमती यमुनाबाई खाडिलकर,** जी. ए.

आमच्या शाळेच्या माजी विद्यार्थिनी, 'नवाकाळ' च्या व्यवस्थापिका. कॉंग्रेसच्या निष्ठावंत कार्यकर्त्या, शाळेविषयी आपुलकी असलेल्या व शाळेला सक्रिय मदत करणाऱ्या. २६ जानेवारी १९७३ रोजी राष्ट्रपतींनी पद्मश्री ही पदवी देऊन त्यांचा गौरव केला.

**सौ. इंदू कर्वे** ( इंदू वीरकर ), बी. ए., बी. टी. ( गडकरी पारितोषिक )

**सौ. निर्मला परांजपे,** एम्. ए.

**सौ. रेखा सु. माहीमकर**

**हिंद प्रिंटिंग वर्क्स, मुंबई ४.**

**डॉ. उषा माहीमकर**

**कु. मोहिनी जोशी,** बी. एस्. सी. ( प्रथम वर्ग )

**सौ. ललिता धोपटकर ( नेने ),** बी. ए., एल्. एल्. एम्.

**प्रा. सुनंदा कर्नाड,** एम्. ए.

**सौ. प्रियंवदा पळसुले** ( कु. नीला महाजन ), बी. ए., मॅनेजर, **कमला प्रिंटिंग प्रेस.**


**सौ. भानुमती नाडकर्णी,** मुख्याध्यापिका, बालमोहन प्राथमिक शाळा, दादर.
राज्य पुरस्कार विजेत्या १९७४

**डॉ. सुनंदा वागळे**

# दिवंगतांच्या कहाण्या

**श्री. अ. वि. भांगले**, माजी शिक्षक

काळ कसा भराभर निघून जात आहे याची कल्पनाच करवत नाही! या शाळेच्या स्थापनेला ५० वर्षे झाली हे खरे सुद्धा वाटत नाही! आणि या ५० वर्षांच्या काळात मी या संस्थेत ४२ वर्षे काम केले यावर आपला विश्वास बसेल का? कुठे १९२८ सन आणि कुठे १९७४ सन!



श्री अ. वि. भांगले

या कालावधीत कोणकोणते शिक्षक आले, गेले व त्यांनी या संस्थेला तिच्या आणिबाणीच्या काळात कसा हातभार लावला तिचा चलचित्रपट माझ्या डोळ्यांसमोरून जाऊ लागला. T. V. सेटवर जशी कहाणी पहावी तसा माझ्या मनश्चक्षुंपुढे मागच्या काळाचा पट मला दिसू लागला. या पटातील ठराविक दिवंगत शिक्षकवर्गाचाच फक्त कार्यक्रम आपणास मी सादर करीत आहे.

प्रत्येक दिवंगत शिक्षक येऊन आपली कहाणी सांगत आहे.

